# केशवसुतांच्या 76 कविता

# पुस्तक  टंकन केलेल्या व्यक्तिंचा परिचय :-

**प्रा पद्माकर  तुळशिराम  तामगाडगे**

सिद्धार्थ कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय मुंबई-



आणि

**कु. राहुल प्रकाश सुवर्णा**

ई-संवाद जनचळवळ, ठाणे

**मुद्रितशोधन :-  कु. राहुल  प्रकाश  सुवर्णा**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | कवितेचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १ | दुर्मुखलेला | ७ |
| २ | आम्ही कोण ? | ८ |
| ३ | अंत्यजांच्या मुलाचा पहिला प्रश्न | ९ |
| ४ | 'पण लक्षात कोण घेतो?' च्या कर्त्यास | १० |
| ५ | तुतारी | ११ |
| ६ | धूमकेतु आणि महाकवि | १२ |
| ७ | आहे जीवित काय ? | १२ |
| ८ | तुझे नाम मुखी | १३ |
| ९ | फुकट दवडलेला तास | १४ |
| १० | गोष्टी घराकडिल | १५ |
| ११ | आईकरिता शोक | १८ |
| १२ | कविता आणि कवि | १९ |
| १३ | सृष्टि आणि कवि | २१ |
| १४ | दूर कोठे एकला जाउनीया | २२ |
| १५ | शब्दांनो! मागुते या! | २४ |
| १६ | गोफण केली छान! | २५ |
| १७ | पद्यपंक्ति | २७ |

| | | |
|---|---|---|
| १८ | स्फुट विचार | २८ |
| १९ | उत्तेजनाचे दोन शब्द | २९ |
| २० | तत्वतः बघता नामावेगळा | ३० |
| २१ | कोठे जातोस? | ३१ |
| २२ | स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य | ३२ |
| २३ | कल्पकता | ३३ |
| २४ | स्वप्नामध्ये स्वप्न! | ३४ |
| २५ | विद्यार्थ्याप्रत | ३५ |
| २६ | घडयाळ | ३७ |
| २७ | दिवस आणि रात्र | ३९ |
| २८ | दवाचे थेंब | ४१ |
| २९ | घुबड | ४३ |
| ३० | दोन बाजी | ४६ |
| ३१ | रांगोळी घालताना पाहून | ४८ |
| ३२ | निद्रामग्न मुली! | ५० |
| ३३ | सिंहावलोकन | ५२ |
| ३४ | एका भारतीयाचे उदगार | ५३ |
| ३५ | गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून | ५५ |
| ३६ | रूढि – सृष्टि – कलि (?) | ५७ |
| ३७ | मजुरावर उपासमाराची पाळी | ५८ |

| | | |
|---|---|---|
| ३८ | “कोणीकडून! – कोणीकडे!” | ६० |
| ३९ | म्हातारी | ६१ |
| ४० | हरपले श्रेय | ६३ |
| ४१ | स्फूर्ति | ६६ |
| ४२ | दिवाळी | ६८ |
| ४३ | फुलपाखरू | ७२ |
| ४४ | संध्याकाळ | ७४ |
| ४५ | फुलातले गुण | ७५ |
| ४६ | पर्जन्याप्रत | ७७ |
| ४७ | मयूरासन आणि ताजमहाल | ७८ |
| ४८ | चिरवियुक्ताचा उदगार | ७८ |
| ४९ | राजा शंतनु | ७९ |
| ५० | वियुक्ताचा उदगार | ८० |
| ५१ | स्मरण आणि उत्कंठा | ८१ |
| ५२ | अढळ सौन्दर्य | ८२ |
| ५३ | एक खेडे | ८४ |
| ५४ | भृंग | ८८ |
| ५५ | फुलांची पखरण | ९० |
| ५६ | पुष्पाप्रत | ९२ |
| ५७ | फुलपाखरू | ९४ |

| | | |
|---|---|---|
| ५८ | चिन्हीकरण | ९६ |
| ५९ | प्रतिभा | ९६ |
| ६० | कवि | ९७ |
| ६१ | फिर्याद | ९८ |
| ६२ | रूष्ट सुंदरीस | १०० |
| ६३ | थकलेल्या भटकणाराचे गाणे | १०१ |
| ६४ | जरी तू ह्या येथे | १०२ |
| ६५ | प्रीती | १०३ |
| ६६ | प्रयाण – गीत | १०४ |
| ६७ | माझा अन्त | १०४ |
| ६८ | फार दिवसांनी भेट | १०५ |
| ६९ | दिव्य ठिणगी | १०७ |
| ७० | सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि | १०७ |
| ७१ | क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास | १०८ |
| ७२ | प्रणय – कथन | १०९ |
| ७३ | मनोहारिणी | १११ |
| ७४ | कवितेचे प्रयोजन | ११३ |
| ७५ | काव्य कोणाचे? | ११४ |
| ७६ | नैऋत्येकडील वारा | ११६ |

# दुर्मुखलेला-

माझे शुष्क खरेच हे मुख गुरो ! आहे, तया पाहुनी
जाती प्रेक्षक सर्वही विरस ते चित्तामधी होउनी;
हे सर्वां उघडे असूनि वदुनी का ते तुम्ही दाविले ?
तेणे भूषण कोणते मग तुम्हा संप्राप्त ते जाहले?

"याचे तोंड कुरूप हे विधिवशात् गाईल काव्ये नवी
तेणे सर्वहि डोलतील जन हे हर्षे कदाचित् भुवि!"
विद्यासंस्कृत त्या तुझ्या क्षणभरी मस्तिष्कतन्तूंवरी
येता नम्र विचार हा , तुज भला होता किती तो तरी!

जे मुंग्या म्हणुनी मनी समजशी या मंडळीभीतरी,
ते पक्षी उडतील होउनि गुरो ! व्योमी, न जाणो, वरी.
राखेची ढिपळे म्हणोनि दिसती जी, ती उद्या या जगा
भस्मिसात् करणार नाहित अशी तुम्ही हमी द्याल का ?

माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या चालावयाचा पुढे
आहे सुंदर तो सदा सरसवाडनिष्यन्द चोहीकडे !
तुम्ही नाहि तरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी !
कोणीही पुसणार नाहि, 'कवि तो होता कसा आननी?'

# आम्ही कोण ?

आम्ही कोण म्हणूनि काय पुससी ? आम्ही असू लाडके-
देवाचे, दिधले असे जग तये आम्हांस खेळावया ;
विश्वी या प्रतिभाबले विचरतो चोहीकडे लीलया ;
दिक्कालातुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके !

सारेही बडिवार येथिल पाहा ! आम्हांपुढे ते फिके ,
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया -
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या ;
फोले पाखडिता तुम्ही , निवडितो ते सत्त्व आम्ही निके !
शुन्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरे ?
पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोण ते ?
ते आम्हीच, सुधा कृतींमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे ;
ते आम्हीच, शरण्य मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभते !

आम्हांला वगळा- गतप्रभ झणी होतील तारांगणे;
आम्हांला वगळा- विकेल कवडीमोलावरी हे जिणं !

## अंत्यजांच्या मुलाचा पहिला प्रश्न-

मुले अंत्यजांची बिचारी मजेने
पथाच्या अहो ! खेळताती कडेने,
दुरूनी तिथे विप्र डौलात आला,
वदे काय तो मुग्ध त्या बालकालाः

"सरा रे दुरी पोर हो म्हारडयांचे !
चला !खेळ हे मांडले डोंबलाचे !
निघा ! वाट द्या लौकरी ब्राम्हणाते !"
पळाली मुले ; - कोण राहिल तेथे !
परी एक त्यातील तैसाचि ठेला;
उगारी तधी दुष्ट तो यष्टिकेला.
म्हणे-" गाढवा! सावली गा पडेल!
दुरी हो ! - पाहा हाच खाऊ मिळेल ! "

तधी बाळ तोही घराला निघाला;
मनी आपुल्या या करी चिन्तनालाः
"जरी त्यावरी सावली माझि गेली ,
तरी काय बाधा असे ठेविलेली ?"

घरी जाउनी तेचि माते विचारी;
वदे तेधवा त्यासि माता बिचारीः
"आम्ही नीच बा; आणि ते लोक थोर;
तया पाहता होइजे नित्य दूर."

सुधे बोलली!- हे परी काय तीते
कळे की जगी नाडुनीया पराते
म्हणूनी करूनी अधी घोर पाप,
जनी गाजवी मानव स्वप्रताप !

## 'पण लक्षात कोण घेतो?' च्या कर्त्यास

युरोपीय कथापुराणकविताग्रंथांतुनी चांगले
ते आहेत कितीक थोर उमदे राऊत वाखाणिले;
ज्यांचे ब्रीद-पवित्र राहुनि जगी दुष्टांस दंडूनिया
कीजे संतत मुक्त दुर्बल जनां, मांगल्य वाढावया.
या त्यांच्या बिरूदामुळेच बहुधा , सन्मान ते जाहले
देते या महिलाजनांस पहिला, स्त्रीवर्गकार्यी भले
ते भावे रतले, क्षणक्षण मुखे स्त्रीनाम उच्चारूनी;
भूपृष्ठस्थित आद्यदैवत जणू त्या वाटली भामिनी !
'आहे रे पण कल्पनारचित हे सारेहि वाग्डम्बर',
हे कोणी व्यवहारमात्रचतुर प्राणी वदे सत्वर !
'नाही – वाचुनि हे पहा', म्हणुनि मी तूझी कथा दावितो.
गेले राउत ते न सर्व अजुनी, हा गर्व मी वाहतो.
धीरा ! उन्नतिचे पथात उमदा राऊत तू चालसी !
नाही काय? करूनि चीत अगदी ही रूढिकाराक्षसी;
टाकाने अपुल्या दुराग्रह जुना मर्मी तसा विंधुनी,
स्त्रीजातीस असाच काढ वरती, घे कीर्ति संपादुनी !

# <u>तुतारी</u>

एक तुतारी द्या मज आणुनि,
फुंकिन मी जी स्वप्रणाने,
भेदुनि टाकिन सगळी गगने
दीर्घ जिच्या त्या किंकाळीने;
अशी तुतारी द्या मजलागुनि.

अवकाशाच्या ओसाडीतिल
पडसाद मुके जे आजवरी,
होतील ते वाचाल सत्वरी
फुंक्र मारिता जीला जबरी-
कोण तुतारी ती मज देइल ?

सारंगी ती, सतार सुंदर,
वीणा, बीनहि, मृदंग, बाजा,
सूरहि, सनई, अलगुज माझ्या
कसची ही हो पडतिल काजा ?
एक तुतरी द्या मज सत्वर.

रूढी, जुलूम यांची भेसुर
संताने राक्षसी तुम्हांला
फाडुनि खाती, ही हतवेला
जल्शाची का? पुसा मनाला !
तुतारिने ह्या सावध व्हा तर ;

अवडम्बरली ढगे कितितरी
रविकिरणांचा चूर होतसे,
मोहर सगळा गळुनि जातसे,
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे !
गाफीलगिरी तरिहि जगावर

## धूमकेतु आणि महाकवि

तुम्ही दोघे कोठुनि चुकला इकडे हो वाटे ?
अन्य श्रेयस विश्वामधुनि खचित मला वाटे !
निश्चिंत तुम्ही स्वयंप्रकाशी अप्रतिहत फिरता,
केन्द्र सोडुनी दूरवरी हो स्वैरपणे भ्रमता !

भास्कर-भसित स्थानापासुनि वेध घेत मोदे,
विश्रांतीचे तमात शिरता आपुल्याचि नादे !
जगातिल महाक्रांतीचे ते भविष्य सांगाया
तुम्ही येतसा - लावितसाहि ते लोका गाया !

जड धातूचे तुम्ही न दिसता - तेजस्तत्त्वाचे !
कोठुनि अथवा ब्रम्हांडी हो स्वेच्छ गमन तुमचे ?
कधीमधि तुम्ही विचित्र पुतळे उगवतसा थाटे !
वदा तर तुम्ही कोठुनि चुकला इकडे हो वाटे ?

## आहे जीवित काय ?

आहे जीवित काय ? केवळ असे निःसार भासापरी ?
किंवा स्वप्न असे ? उठे बुडबुडा कालप्रवाहावरी ?
दुःखे काय अनंत त्यात भरली ? की कष्ट जीवा पडे ?
सौख्याचे न तयात नाव अगदी ऐकावया सापडे !
नाही स्वप्न, न भास वा बुडबुडा: जीवित्व साचे असे !
प्रेमाने परमेश्वरास भजतो जो निर्मले मानसे !
लोटी निर्मल सौख्यसिंधुलहरी त्याचेवरी जीवित,
तो आनंदनिधानशैलशिखरा क्रीडा करी संतत !

# तुझे नाम मुखी

तुझे नाम मुखी ध्यान तुझे डोळा
वृत्ति या चंचळा स्थिरावल्या !
चिंता भय दुःखे अवघी दूर झाली
अनाथांचा वाली जवळी केला.
भिकार या जगी इच्छित न मिळे काही
म्हणुनी तुझे पायी भिक्षां-देहि
केशवसुत म्हणे देवा दीन - नाथा
तुझे पायी माथा वाहियेला

## फुकट दवडलेला तास -

यंत्री कालनिदर्शनी खणखणा ठोके पडू लागले,
तो माझ्याजवळूनि कोणि उठके ऐसे मला वाटले.

मी ते कोण म्हणूनि जो निरखण्या वेगे उभा राहतो,
दारातून पदे सरोष निघुनी आता तघी ऐकतो.

न्याहाळूनि विलोकिता मज पुढे आकार आभासला;
पाठीला फिरवूनि तो मजकडे होता क्षणी चालिला.

मो, पाठीवर त्याचिया ‘ फुकट जो घालीवला तास तो !’
ज्वालाही लिहिले, असे निरखता, तो गुसता पावतो !

‘घिडमाम’ बोलत अश्रु ढाळित, पदे मागे जरा गाळित
पश्र्चात्ताप अघोमुखे मजमघे तो जांय संचारत;

तो कोणी मधुर-स्वरे मज हळू संबोधिले ऐकता,
किंचित नेत्र घरूनिया उचलूनि मी जाहलो पाहता.

अशा आणि तिची बहीण कविता ह्या घेउनी पातला
तो मी ‘तास नवा’ बघूनि जवळी मोदे नमस्कारिला.

‘आता व्यर्थ रडूनि काय फळ रे ?’ आशा असे बोलली,
‘या काहीतरि गा नवीन,’ कविता आज्ञापिति जाहली!

## गोष्टी घराकडिल

गोष्टी घराकडिल मी वदता गडया रे !
झाले पहा कितिक हे विपरीत सारे -
आहे घरासाचि असे गमते मनास,
ह्या येथल्या सकळ वस्तु उगीच भास ! 1

ही देख म्हैस पडवीमधि बांधलेली
रोमंथभाग हळु चावित बैसलेली.
मित्रा ! गजांमधुनि या पडवीचिया रे !
मौजा पहा क्षणभरी रजनीचिया रे 2

डोळ्यात बोट जरि घालुनि पाहशील
अंधार तो अधिकची तुजला दिसेल.
अंधार - जो फलक होत असे अम्हांस
चेतोनिबध्दजनचित्र लिहावयास ! 3

आवाज किर्र रजनी वदतेच आहे,
'धो धो' असा पवन नादहि बोलताहे;
ऐके पलीकडुनि बेडुक शतभाती
पर्जन्यसूक्त सगळे मनोसक्त गाती ! 4

ही चारपाच चढुनी हळु पायठाणे
या ओसरीवर अता जपुनीच येणे !
हे ऐक रे 'टकमका' करिते घडयाळ,
ह्या शांततेत गमते कुटितेच टाळ. 5

डावीस हा बघ निरखुनि एक माचा
निद्रिस्त त्यावरि पिता अति पूज्य माझा;
त्याचा खरोखर न मी क्षण पुत्र शोभे,

तो सर्वद जरि म्हणे मज पुत्र लोभे ! 6

तातास या बघुनिया हृदयात खाते,
होऊ हे हृदय विव्हळ सर्व जातें !
त्याच्या तरी पदयुगावरि या पड्नी
न्हाणू तयास मग का वद आसवांनी ? 7

ताताचिया बघ गडया उजवे कडेला
बापू असे तिथं बरे अमुचा निजेला;
अज्ञान तो चपलधी परि बाल आहे,
त्याचेविशी मम मनी अतिलोभ राहे ! 8

बापू, गडया! ध्वज उभा करशील काय ?
तू देशकारण करू झटशील काय ?
बापू, जनात दिवटी धरिशील काय ?
स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय ? 9

मित्रा, धरी सुदृढ हस्त मदीय फार
दारास आडसर घट्ट असेल थोर;
दाराचिया तर फटीतुन आत जाऊ
सानंद सुस्थित घरातिल सर्व गाऊ ! 10

मित्रा, इथे कितितरी मज हर्ष होई,
येथे हवा मधुर निःश्वसनात येई,
नाही कधीहि बुधवार-वनात जैशी
वाटेवरी चतुरशिंगिचिया न तैशी ! 11

मित्रा ! असा हळुच ये उजवे कडेस,
खोली पहा पघळ ही किती ऐसपैस.
निद्रावश स्वजन येथ बघूनि यास
हर्षाचिया न उकळ्या फुटती कुणास ? 12

ती एक खाट अवलोक समोर आता,
आहे सुपुप्तिवश तेथ मदीय माता;
तीचे कुशीत निजली दिसते मदीय
भीमा स्वसा, बघुनि ती मज हर्ष होय. 13

मत्कारणे स्तवुनि देव निजावयाते
आलीस तू खतिच गे असशील माते !
मोठे त्वदीय उपकार, जरा तरी ते
जातील का फिटुनिया तव पुत्रहस्ते ? 14

खाली मदीय भगिनी दिसती निजेल्या,
गोष्टी जयांस कथिता न पुऱ्याच झाल्या !
ती कोण दूर दिसते? निजली असूनी
जी श्वास टाकित असे मधुनीमधूनी ! 15

कांताच ही मम; अहा सखये ! मदीय
स्वप्ने अता तुज गडे दिसतात काय ?
आता असो ! पण पुढे तुजला दिसेन
स्वप्ने तुझी मग समक्ष तुला पुसेन. 16

मागील दारि सखया, तुळशीस आता
वन्दू, जिला मम जनी नमिला स्वमाथा !
सोडूनि गाव वळणे अमुच्या घराचे
येऊ घरा परत खासगिवालियाचे ! 17

## आईकरिता शोक

अंतरले पाय तुझे हाय हाय माते !

मागे तव दर्शन मजलागुनी जहाले,
तदनंतर लोटुनिया दिवस फार गेले;
फिरूनि तुझ्या चरणांते
उत्सुक मी बघण्याते
असता, अंतीहि न ते
दिसले की अहह ! पूर येत लोचनाते ॥ अंतरले पाय. 1

फिरूनि तुझे कोठे ते तीर्थरूप पाहू !
पादरजी लोळूनि तव धन्य केवि होऊ !
जनकामागे जागृत
जननी गे ! तू दैवत
उरलिस, तीही साम्प्रत
गेलिस सोडुनि आम्हा दीन बालकांते ॥ अंतरले पाय. 2

कठिण जगी या बघती छिद्र काक सारे,
करूणेचे कोठेही नसे लेश वारे !
तुझ्यासवे क्षमा दया
प्रीतिही गेली विलया !
मदपराध घालुनिया
पोटी नुरले कोणी प्रेम करायाते ॥ अंतरले पाय. 3

कष्ट दिले तुजला मी फार फार आई !
त्यांची मजकडुनि फेड जाहली न काही !
दुर्भग मी असा असे
म्हणुनि दुःख वाटतसे,
कंठ फार दाटतसे,
रडतो गुडघ्यांत म्हणुनि घालुनी शिराते ॥ अंतरले पाय. 4

## कविता आणि कवि

अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता, म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
अहात मोठे, पुसतो तुम्हांला. 1

युवा तसा तो युवतीस मोहे,
तसा कवी हा कवितेस पाहे;
तिला तसा तो करितो विनंती
तसा हिला हा करितो सुवृत्ती. 2

लाडीगुडी चालव लाडकीशी
अशा तऱ्हेने, जरि हे युव्याशी
कोणी नसे सांगत, थोर गौरवे
का ते तुम्ही सांगतसा कवीसवे ? 3

करूनिया काव्य जनात आणणे
न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणे;
करूनि ते दंग मनात गुंगणे,
तदीय हा सुन्दर हेतु मी म्हणे. 4

सभारूची पाहुनि अल्प-फार
रंगी नटी नाचवि सूत्रधार;
त्याचे तयाला सुख काय होय
ते लोकनिन्दाभयही शिवाय ! 5

नटीपरी त्या कविता तयाची
जनस्तुती जी हृदयात याची;
पढीक तीचे परिसून बोल
तुम्ही कितीसे भुलुनी डुलाल ? 6

स्वभावभूविष्ट जिच्यात माधुरी
अशी तुम्हांला कविता रूचे जरी,
कवीस सोडा कवितेबरोबरी,
न जाच वाटेस तयाचिया तरी, 7

तयाचिया हो । खिडकीचिया उगे
खाली तुम्ही जाउनि हो रहा उभे;
तिच्या तयाच्या मग गोड लीला
ऐकूनि पावाल तुम्ही मुदाला ! 8

# सृष्टि आणि कवि

मी एकला फिरतसे बहुवार रानी,
यालागुनी न समजा मजला अडाणी;
आराधुनी विपिनदैवत मी तिथूनी
त्याची प्रसादवचने मनुजांस आणी.
पाहून निर्झर उरी कर वेंगुनीया
मी ठाकतो, परि न मंद म्हणा जना या.
प्रत्येक मेघ वरता फिरता नभात
एकेक शब्द लिहितो मम पुस्तकात !
पुष्पे वनात कसली खुडितो फिरोन !
उद्योगमग्न जन हो ! मज हे म्हणा न,
नक्षत्रसे सुम मदीय करातले ते
सत्क्लृप्तिपूरित असे सदनास येते !
पुष्पामधे प्रकट होउन जे जराही
सृष्टीत एकहि रहस्य असे न काही;
ज्याचा ध्वनी न उमटे खगकूजितात
नाही निगूढ इतिहास असा जगात !
शेतामधूनि सदनाप्रत पीक एक
नेतात पुष्ट बलिवद तुझे सुरेख,
तूझी जमीन दुसरे मज पीक देते.
काव्यात साठवुनि ठेवितसे पहा ते !

## दूर कोठे एकला जाउनीया

दूर कोठे एकला जाउनीया,
एकतारी आपुली घेउनीया,
स्वेच्छ होतो छेडीत ती, मनाला
दुःखिताला आराम व्हावयाला.

आजवेरी बहु मनोभंग झाले,
बहुत आशांचे प्राण निघुनि गेले.
तया शोचाया निर्जनात जावे,
एकतारी छेडीत मी बसावे !

आजदेखिल मी तसा अस्तमानी
वाद्य वेडवाकुडे वाजवूनी
दंग झालो स्वच्छंद गायनाने;
खरे संगीतज्ञान कोण जाणे !

हृदय आत्म्याला जधी खेळवीते,
हृदय आत्म्याला जधी आळवीते,
तधी तुमचे ते नको कलाज्ञान
तधी हृदयासम नसे तानसेन !

असो; असता मन गायनात लीन
रात्र झाल्याचे भान राहिले न;
जसे कलहंसा वाहता प्रवाही
प्राप्त मरणाचे ज्ञान नसे काही !

अहा ! अदभुत तो काय एक झाले -
"धन्य बन्धो!" हे शब्द वरूनि आले!
वरी बघता तारका उंच आहे,
सदय सस्मित मजकडे वरूनि पाहे,

‘कवे! बन्धो!’ ती वदे नभातून
‘तुझी गीते परिसूनि मी प्रसन्न;
स्वसा आतापासून समज माते
बन्धु माझा तू, मंगल हे नाते!’
प्रसादे त्या वाकता, काजव्याचे
स्फुरण खाली बघुनि म्हणे, ‘याचे
साम्य काहीतरि असे तुशी तारे!’
माझिया तर जीविती तिमिर सारे!’

‘नको ऐसे रे वदू, बन्धुराया!’
म्हणुनि लागे ती मला आश्वसाया;
‘तुझ्या दिव्यत्वापुढे जग भिकारी;
कासया ही खिन्नता? दूर सारी!’

अशा भगिनीचा लाभ मला झाला;
खेद गेला, आनंद मनी आला;
तिचा आभारी, दुवा देत तीते,
समाधानी मी पातलो घराते!

## शब्दांनो! मागुते या!

तेजाचे पंख वाऱ्यावरि हलवित ती चालली शब्दपंक्ति,
देव्हारा शारदेचा उचलुनि गगनातूनि तो नेत होती;
शब्दांही चित्तभूमी विकसित हिरवी तो मदीया बघूनी
देव्हारा माझिया तो उत्तरूनि हृदयी स्थापिला गौरवूनी.

शब्दांसंगे तदा मी निजहृदयवनामाजि संचार केला,
तेथे मी कल्पपुष्पे खुडुनि नमुनि ती वाहिली शारदेला.
शब्दांच्या कूजिताने सहजचि मम हृत्प्रांत गुंगूनि गेला;
मी त्या स्वप्नात गद्यग्रथित जग मुळी लोटिले तुच्छतेला.

रागाने या जगाने अहह! म्हणुनिया शापिले या जनाला
तेणे चिंताग्नि माझी हृदयहरितता नाशिता फार झाला.
गाणारे शब्द सारे झडकरि उडुनी दूर देशास गेले,
वाग्देवीपीठ येथे परि मम हृदयी दिव्य ते राहियेले.

वाग्देवी शारदे गे! फिरवुनि अपुले शब्द पाचार येथे;
साहाय्यावीण त्यांच्या भजन तव कसे सांग साधेल माते?
आशामेघालि चिंतानल अजि विझवू जाहलीसे तयार,
शब्दांनो, मागुते या; बहर मम मनी नूत्न येईल फार!

## गोफण केली छान!

स्वहृदय फाडुनि निजनखरी
चिवट तयाचे दोर

काढुनि गोफण वळितो ही
सत्वाचा मी चोर!

त्वेषाचा त्या दोराला
घट्ट भरूनिया पीळ

गाठ मारितो वैराची
जी न पीळ दवडील!

वैर तयांला बसती जे
स्तिमितचि आलस्यात,

वैर तयांला, पोकळ जे
बडबडती तोऱ्यात!

वैर तयांला, वैरी जे
त्यांच्या पायधुळीत

लोळुनि कृतार्थ होती जे
प्राप्त तूपपोळीत!

वैर तयांला, पूर्वीच्या
आर्यांचा बडिवार

गाउनि जे निज षंढत्वा
मात्र दाविती फार!

वैर तयांला, थप्पड बसता
चोळिति जे गालास,

वैर तयांला, जे गरिबी
शिकवितात बालांस!

गाठ मारूनी वैराची
गोफण केली छान;

कठिण शब्द या धोंडयांनी
करितो हाणाहाण!

## पद्यपंक्ति

आम्ही नव्हतो अमुचे बाप
उगाच का मग पश्चाताप?
आसवे न आणू नयनी,
मरून जाऊ एक दिनी!

X X X

अमुचा पेला दुःखाचा,
डोळे मिटुनी प्यायाचा;
पिता बुडाशी गाळ दिसे,
त्या अनुभव हे नाव असे!
फेकुनि द्या तो जगावरी;
अमृत होउ तो कुणातरी.

X X X

जे शिकलो शाळेमाजी
अध्याहृत ही टीप तया -
"द्वितीय पुरूषी हे योजी,
प्रथम पुरूष तो सोडुनिया!"

## स्फुट विचार

विश्वाचा विस्तार केवढा?
ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा

सृष्टिकेंद्र तो कवठया ठायी
ज्याच्या त्याच्या आहे हृदयी

स्वीकरणीय जनी करिते जे -
दातव्या, ती कला जाणिजे.

काय निराशा असे बरे? –
बुजगबाहुले जगातले;
मूर्ख भिउनिया त्या गेले;
सुज्ञ बये तद्रूप खरे.

स्वये भयापासुनि पळणे,
भयसमयी साहस करिती
त्या अपजय येता हसणे,
हे विकत असे या जगती
शहाणपण या नावाने!

## उत्तेजनाचे दोन शब्द

जोर मनगटातला पुरा
घाल, घाल खर्ची;
हाण टोमणा, चळ न जरा;
अचूक मार बर्ची!
दे टोले जोवरी असे
तप्त लाल लोखंड;
येइल आकारास कसे
झाल्यावर ते थंड?
उंच घाट हा चढूनिया
जाणे अवघड फार;
परि धीर मनी धरूनिया
न हो कधी बेजार!
यत्न निश्चये करूनी तू
पाउल चढते ठेव;
मग शिखराला पोचुनि तू
दिसशिल जगासि देव!
ढळू कधीही देउ नको
हृदयाचा निर्धार,
मग भय तुजला मुळी नको
सिध्दि खास येणार!
झटणे हे या जगण्याचे
तत्व मनी तू जाण;
म्हणून उद्यम सोडु नको
जोवरि देही प्राण!

## तत्वतः बघता नामावेगळा

तत्वतः बघता नामावेगळा
कोण नाही सांगा मजला!

भिन्नव्यक्तित्व नामाला;
नामकरण होतसे.

नाम म्हणजे अभिधान
अभिधान म्हणजे ते वरून

धारण केले, ज्यामधून
अंतःसाक्ष पटतसे.

भाव शब्दस्पर्शहीन
तैसे रूपरसगंधांवाचुन;

अतएव ते विषय जाण
इन्द्रियांचे नव्हेत.

हो तो वाणी मिथ्या वाटे,
कारण, पंचविषयांचे थाट

भाव नटती, खरेखोटे
विचारूनी पाहिजे.

## कोठे जातोस?

"कुठे जाशी?" – "शर्करा प्यावयाला;
अमुक पंताला पुत्र असे झाला;
म्हणुनि आता इष्टांस वाटण्यास
हवी आहे शर्करा बह्र त्यास."

"कुठे जाशी तू?" – "फुले आणण्याते;
तमुक रावाच्या असे लग्न येथे.
वधुवरांला त्या गळा घालण्याला,
करायाच्या आहेत तेय माळा."

"आणि कोठे तू?" – "नविन पसारा तो
संसृतीचा मांडीत आज आहे;
म्हणुनि बाजारा करायास जातो -
घरी जिवलग ती वाट बघत आहे!"

"आणि तू रे?" – "जातसे आणण्यासी
वैद्यबोवाला, अमुक वृध्द यासी
वायु झालाहे" - "जा परेत - वस्त्रे
विकत घेउनि शोध तू गोवऱ्या रे!"

पुढुनि दिसते मग मढे एक येता
"कुठे बाबा जातोस सांग आता?"
हवेतुनि हे पडतात शब्द पाही
"कुठे जातो हे मला कळत नाही!"

## स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य

आरंभी, म्हणजे मनुष्य नव्हता तेव्हा, क्षितीपासुनी
होता स्वर्ग न फार दूर; अपुल्या कांतिप्रसन्नेक्षणी

तो पृथ्वीप्रत सौख्य नित्य वितरी, तेव्हा पुढे त्यावरी
गेली प्रीति जडून गंधवतिचे चित्तात भारी खरी.

निर्मीला नर नन्तर स्वतनुच्या तीने मळीपासुनी
इच्छा आपुलिया धरून हृदयी ही - गायने गाउनी

स्वर्गा आळवुनी नरे सुकुशले मोहूनिया टाकिजे,
स्वर्गे येउनि खालती मग तिशी प्रेमे सदा राहिजे.

या दुष्टे पण मानवे स्वजनना-पृथ्वीस ताडूनिया
लाथेने, अपुल्या मनी अवथिले स्वर्गावरी जावया;

ती पाहूनि कृतघ्नता निज मनी तो स्वर्ग जो कोपला,
आवेशात उडूनि दूरवर तो जाता तधी जाहला.

तेव्हापासुनि ही धरा झुरतेस; माते! चुकी जाहली!
स्वर्गा! तूहि अम्हा क्षमस्व सदया! ये खालता भूतली -

ये बा! आणि या धरेस अगदी देऊ नको अंतर!
आहे तूजवरी तसेच बसले स्वर्गा! तिचे अंतर.

## कल्पकता

खा, पी, नीज, तसा उठूनि फिरूनि ते तेच जा चिंतित,
आवर्ती जग या ठरीव अपुल्या होते हळू रांगत;
एका दुर्गम भूशिरावरि परी देवी कुणी बैसली,
होती वस्त्र विणीत अदभुत असे ती गात गीते भली.
होते शोधक नेत्र, कर्णहि तिचे ते तीक्ष्ण भारी तसे,
होते भाल विशाल देवगुरूने पूजा करावी असे.
सूर्याची, शशिची सुरम्य किरणे घेऊनि देवी सुधी
होती गोवित इंद्रचापहि तसे, त्या दिव्य वस्त्रामधी.
मेघांच्याहि छटा, तशीच कुटिला विद्युत, तसे ते ध्वनि
लाटा, पाऊस, पक्षि ते धबधबे - यांते पटी ती विणी,
तारांचे पडणे, तसे भटक़णे केतुग्रहांचे, पहा,
सारे सुंदर, भव्य घेउनि तिने ते वस्त्र केले अहा!
आली भू कुतुके तिथे तिस तिने ते वस्त्र लेवीवले;
तो त्या वृध्द वसुंधरेवरि पहा! तारूण्य ओथंबले.
भूदेवी मग दृष्ट होउनि मनी, नाचावया लागली,
'आता स्वर्ग मला स्वचेय वरण्या येईल,' हे बोलली.

## स्वप्नामध्ये स्वप्न!

हे चुम्बन निजमुखावरी माझे घे
जाता जाता हे मज बोलू दे गे -
वाटे तुज की माझे दिवस पळाले
स्वप्नापरि, ते खोटे नच गे बाले !
तथापि जर ती गेली आशा निघुनी
एका रात्रीतुनि वा दिवसामधुनी
स्वप्नामधुनी किंवा न-कशातुनिहि,
तर ती गेली कमती का गे काही?
सर्व अम्ही जे बघतो करितो वा जे
स्वप्नातिल ते स्वप्नच, सखये माझे!
कल्लोळांच्या क्षोभे गर्जत आहे
त्या सागरतीरी उभा गढे! मी आहे.
धरिले असती मी या स्वकरांमाजी
स्वर्णवालुकाकण, जे नसती राजी;
किती थोडके, परी कसे ते गळति - पहा ते पळती
माझ्या बोटांमधुनि सागरा जाती;
माझ्या नेत्रांमधुनि, आसवे चलति - आसवे गळती!
अहा ईश्वरा! घट्ट मूठ ही वळुनी,
पकडाया ते शक्त मी न का म्हणुनी?
अहह! ईश्वरा! शक्ति न का राखाया
एकहि कच निर्घृण लाटेपासुनि या?
बघतो आम्ही करितो वा जे सारे
स्वप्नातिल ते स्वप्नच व्हावे का रे?

## विद्यार्थ्यांप्रत

१

महत्त्व भारी आहे या पृथ्वीचे,
त्याहूनि अतिशय या सगळ्या विश्वाचे;
परि तुजमध्ये महतीचे जे बीज
त्याहूनि काही मोठी नाही चीज!-
ठसव मनी हे साचे,
बाबा!
हे वच बहु मोलाचे.

२

अग्नि असे हा तेजस्वी रे फार,
त्याहूनि भारी सूर्य नभीचा थोर;
परी किरण जो तुजमध्ये सत्याचा
प्रकाश सर्वोत्तम तो आहे त्याचा-
घोक सदा हे वाचे
बाबा!
हे वच बहु मोलाचे.

३

पृथ्वीमध्ये रत्ने बहु आहेत,
आकाशी तर असंख्य दिसताहेत,
परि एक रत्न तुजमध्ये जे सच्छी;
कोणाला नच सर त्याची येईल -
स्मरण असू दे याचे
बाबा!
हे वच बहु मोलाचे.

४

स्नायूमध्ये पुष्कळ आहे शक्ति,

नृपवेत्री तर फारच आहे म्हणती;
परि एक एक जो नवा शब्द तू शिकसी
शक्ति तयाची उलथिल सर्व जगासी!
पठन तर करी त्याचे
बाबा!
जग हे बदलायाचे.

## घडयाळ

गडबड घाई जगात चाले,
आळस डुलक्या देतो पण;
गंभीरपणे घडयाळ बोले -
‘आला क्षण - गेला क्षण!’
घडयाळास या घाई नाही,
विसावाहि तो नाही पण;
त्याचे म्हणणे ध्यानी घेई-
‘आला क्षण - गेला क्षण’
कर्तव्या जे तत्पर त्यांचे
दृंढ नियमित व्हावयास मन,
घडयाळ बोले अपुल्या वाचे -
‘आला क्षण - गेला क्षण!’
कर्तव्याला विमुख आळशी
त्यांच्या हृदयी हाणित घण,
काळ - ऐक! गातो अपुल्याशी
‘आला क्षण - गेला क्षण!’
लवाजम्याचे हत्ती झुलती
लक्ष्य त्याकडे देतो कोण!
मित रव जर हे सावध करिती-
‘आला क्षण - गेला क्षण’
आनंदी आनंद उडाला!
नवरीला वर योग्य मिळाला;
थाट बहुत मंडपात चाले-
भोजन, वादन, नर्तन, गान!
काळ हळू ओटीवर बोले
‘आला क्षण - गेला क्षण!’
‘कौतुक भारी वाटे लोकां
दाखविण्या पाहण्या दिमाखा;

तेणे फुकटचि जिणे होतसे!
झटा, करा तर सत्कृतिला!'
सुचवित ऐसे काळ वदतसे-
'क्षण आला - क्षण गेला!'
वार्धक्य जर सौख्यात जावया
व्हावे, पश्चात्ताप नुरूनिया,
तर तरूणा रे! मला वाटते
ध्यानी संतत अपुल्या आण
घडयाळ जे हे अविरत वदते-
'आला क्षण - गेला क्षण!'

# दिवस आणि रात्र

दिवस बोलतो, 'उठा झणी,'
रात्र 'विसावा घ्या,' म्हणते;
या दो वचनी दिन - रजनी
बह्रत सुचविती, मज गमते,
दिवस सांगतो, 'काम करा!'
रात्र 'विचार करा मनी,'
दिवस बोलतो 'मरा, मरा!'
रात्र 'मजमुळे जा तरूनी.'
दिवस वदतसे, 'पहा प्रकाश;'
आत शिरतसे परि अंधार!
रात्र बोलते, 'पहा तमास;'
परि आत पडे प्रकाश फार!
दिवस म्हणे, 'जा घरातुनी.'
रात्र वदे, 'या सर्व घरास.'
स्पर्धा लावी दिवस जनी;
रात्र शिकविते प्रीति तयांस!
नक्षत्रे जगतीवरली
दिवस फुलवितो, असे खरे;
पुष्पे आकाशामधली
रात्र खुलविते, पाहा बरे.
एकच तारा दिन दावी,
असंख्य भास्कर परी निशा;
दिवस उघडितो ही उर्वी
रजनी अनंत आकाशा!
दिवस जनांला देव दिसे,
परि गद्यच त्याच्या वदनी;
रात्र राक्षसी भासतसे,
परि गाते सुंदर गाणी!

‘ही भूमी हा नरक!’ असे
वदे अदय दिन वारंवार;
‘ही धरणी हा स्वर्ग असे!’
गाते रजनी, जी प्रिय फार!

## दवाचे थेंब

"कोठुनि हे आले येथे?
काल संध्याकाळी नव्हते;"
हिमकण पाहुनि ते वेली-
वरि पडले आज सकाळी-

आईला बाळ्या वदला
कुतुकाने उत्सुकलेला-
"दिसती हे गोजिरवाणे
मोत्यांचे जैसे दाणे!

आई ग! तर वद माते,
कोठुनि हे आले येथे?
सूर्याच्या ह्या किरणांत
कसे पहा चमकतात!
मौज मला भारी वाटे!
होते हे तर वद कोठे?"

चुंबुनिया त्या तनयाते
वर करूनी बोट वदे ते-
"चंद्र आणि नक्षत्रे ती
शोभली जेथ वा राती,
उजेडही जेथुनि येतो
पाऊसही जेथुनि पडतो,

तेथुनि हे आले येथे,
तेथुनीच तू आम्हांते!"

"राहतील येथे का ते?
मिळतिल का खेळायाते?

मज गंमत वाटे आई!
घेउनि दे मजला काही.”

“नाही रे! ते स्वकरात
येणार गडया! नाहीत;
कौतुक कर बघुनी त्यांते
असती ते जोवरि येथे;
सूर्य त्यांस अपुल्या किरणी
नेईलचि लौकर गगनी,”
‘जातिल ते लौकर गगनी,’
वदता गहिवरली जननी.
गतबाळे तिजला स्मरली
डोळ्यांत आसवे आली!

“देवा रे!” मग ती स्फुंदे,
“एवढा तरी लाभू दे!”
म्हणुनि तिने त्या बालासी
धरिले दृढ निज हृदयाशी!

पाहुनि त्या देखाव्याला
कळवळा कवीला आला;
वेडावुनि तयाच नादे
“खरेच!” तो पुसतो खेदे -

“होते हिमबिंदु सकाळी,
कोठे ते सायंकाळी?”

## घुबड

श्यामा राणी गभीर रजनी
अलंकृता जी नक्षत्रगणी
वेत्र आपुले उंच धरोनी
बसुनी राज्यासनी दरारा दावित आहे जो फार,
समोरच्या चिंचेवरूनी तो
घुबड तियेचा बन्दीजन तो
घूघ - घूघू - महिमा तीचा वर्णी करूनी घूत्कार! १

कवी आपुल्या खिडकीमधुनी
बाहेर बघे शून्य लोचनी;
स्तब्धत्व जनी, स्तब्धत्व वनी
मनीहि दयितानिदधने वागे स्तब्ध निराशा अनिवार
अवघड झाले एकलेपणे;
परि त्या तरूवरूनी घुबडाने
'ऊ, मी तुज सोबत!' म्हटले, घूघू करूनी धूत्कार! २

"खाशी सोबत!" कवी म्हणाला,
"माझ्या विरहव्यथित मनाला
वाटे मनुजांचा कंटाळा,
दुःख करित बैसणे आवडे, जेथे राहे अंधार;
हा मित्र मला भला मिळाला
धीर मदीय मना द्यायाला."
"ऊहू ऊहू!" उत्तर दिधले त्याने करूनी धूत्कार! ३

"नाही? धीर न देशिल काय
शोके मी मोकलिता धाय?
ओढवले की अदृष्ट हाय!
गुणरूपवती प्रिया निमाली! झाले सारे निस्सार -

विलाप ऐसे ऐकुनि माझे
द्रवेल काय न बा हृदय तुझे?”
“ऊहू ऊहू!” उत्तर बोले त्याचा भेसुर धूत्कार! ४

“हे अप्रतिमे! प्रिये! अप्रियतमे!
तुजवीण जिणे निर्माल्य गमे!
अहह! वेढिले असे मज तमे!
मरून तर मी, जेथ वसे ती दिवंगता दिव्याकार,

तेथ पूजिली सुरांगनांनी
पाहिन काय न सखी स्वनयनी
“ऊहू ऊहू!” बोले निष्ठुर त्या घुबडाचा धूत्कार! ५

“बरे, बरे! मी नरकी जाइन
घोर यातना तेथिल सोशिन
खेद न त्यांचा अगदी मानिन,
जर त्या स्थानी वागेल मनी कान्तेचा पुण्याकार;

तेथ तियेचे द्याया दर्शन
स्मृति मम समर्थ होइल काय न?”
“ऊहू - घूघू!” बोले निर्घृण त्या दगडाचा धूत्कार! ६

“जा निघ येथुनि! मला रडू दे,
शोके माझे हृदय कढू दे!
कानी परि तव रव न पडू दे,
जो मम खिन्नपणावरि लादी निर्विण्णपणाचा भार!

डाग न देहू मम दुःखावर,
काळे कर तू येथुनि सत्वर!”
“घुघू - ऊहू!” दे प्रत्युत्तर त्या अधमाचा धूत्कार! ७

निशीथसमयी या अंधारी
वेताळाची मिरवे स्वारी,

पाजळुनिया टेंभे सारी
भुते नाचती भयानकपणे! चित्ती उपजविती घोर!

नैराश्ये मज पुरे घेरिले,
खिडकीपुढुनी घुबड न हाले,
घूघू! घूघू! चाले त्याचा घूघू भीषण धूत्कार! ८

## दोन बाजी

त्या शूराने भगवा झेंडा हिंदुस्थानी नाचविला,
निजराष्ट्राचे वैभव नेले एकसारखे बढतीला;
जिकडेतिकडे समशेरीची कीर्ति आपुल्या गाजविली,
खूप शर्तिने कदर आपुली गनीमास त्या लावियली,

आणि तुवा रे! – त्या नीचाने पाठ आपुली दावुनिया
रणातुनी पौबारा केला शेपुट भ्याडा वळवुनिया! १

गुणी जनांची पारख करूनि त्या धीराने गौरविले,
उत्साहाच्या वाते अपुल्या तेज तयांचे चेतविले;
प्रतापदीपज्योति पोषिली सुजनस्नेहा वाढवुनी;
गनीममशके कितीक गेली तिच्यामधे खाक होवोनी.

आणिक तू रे! नाचलासि तू नग्नच संगे अधमांचे,
धूळ खात गेलास, लाविले सर्वत्र दिवे शेणाचे! २

भटांस, जे रणधुरंधर तया, पाचारूनि त्या सिंहाने
माराया की मरावया अरिवरि नेले आवेशाने;
'हरहर' शब्दा परिसुनि वळली कितिकांची घाबरगुंडी,
'अला मराठा!' म्हणत पळाल्या सैरावैरा किति लंडी!

तूहि भटांना पाचारियले, काय त्यांसवे परि केले?
यथेच्छ लाड्डू मात्र झोडिले - नाव हाय रे बुडवीले! ३

घोडयावरीच ह्रदा चोळित शत्रुशासना धावोनी!
तो गेला, - तू बिछान्यावरी राहिलास रे लोळोनी!
वीर भले खंबीर आणखी मुत्सद्दी ते सदबुध्दी
त्यांच्या साह्ये निजसत्तेची त्याने केली रे वृध्दी,

पण तू रे! तू - नगरभवान्या, नाच्चेपोऱ्ये घेवोनी
दौलतजादा केला धिक धिक भटवंशी रे जन्मोनी. ४

या भटवंशी महाप्रतापी ख्यात जाहले असूनिया
तुळशीमध्ये भांग निघाली अभद्र ऐशी कोठुनिया!
निजनामाचा ‘गाजी’ ऐसा अर्थ उरवुनी तो गेला
तर हळहळली आर्यमाउली ऐकुनि त्याच्या निधनाला.

मरणाआधिच मरून आणुनि काळोखी निजराष्ट्राला,
तू गेलासी करून ‘पाजी’ अहह पितामह नामाला!

## रांगोळी घालताना पाहून -

होते अंगण गोमये सकलही संमार्जिले सुंदर,
बालार्के अपुली प्रभा वितरली नेत्रोत्सवा त्यावर;
तीची जी भगिनी अशी शुभमुखी दारी अहा पातली;
रांगोळी मग त्या स्थळी निजकरे घालावया लागली.

आधी जे लिहिले तिने रविशशी, नक्षलमाला तदा,
मध्ये स्वस्तिक रेखिले, मग तिने आलेखिले गोष्पदां;
पद्मे, बिल्वदले, फुले, तुळसही, चक्रादिके आयुधे,
देवांची लिहिली, न ते वगळिले जे चिन्ह लोकी सुधे.

होती मंजुळ गीत गात वदनी अस्पष्ट काहीतरी,
गेला दाटुनि शांत तो रस अहा तेणे मदभ्यंतरी;
तीर्थे, देव, सती, मुनी, नरपती, देवी तशा पावना,
अंतदृष्टिपुढूनिया सरकल्या, संतोष झाला मना!

चित्रे मी अवलोकिली रूचिर जी, काव्ये तशी चांगली,
त्यांही देखिल न स्मरेच इतुकी मदवृत्ति आनंदली;
लीलेने स्वकरे परंतु चतुरे! तू काढिल्या आकृती,
त्या या पाहुनि रंगली अतिशये आहे मदीया मति.

रांगोळीत तुझ्या विशेष गुण जो आर्ये! मला वाटतो,
स्पष्टत्वे इतुक्या अशक्य मिळणे काव्यात, चित्रात तो;
स्वर्भूसंग असा तयात इतुक्या अल्पावकाशी नसे
कोणी दाखविला अजून सुभगे! जो साधिला तू असे.

आदित्यादिक आकृती सुचविली दिव्यत्व ते उज्ज्वल,
तैसे स्वस्तिक सूचवी सफलता धर्मार्थकामांतिल;
पावित्र्याप्रत गोप्पदे, तुळसही, शोभेस ही सारसे,

पुष्पे प्रीतिस, चक्र हे सुचविते द्वारी हरी या असे!

तत्त्वे मंगल सर्वही विहरती स्वर्गी तुझ्या या अये!
आर्ये ! तू उपचारिकाच गमसी देवी तयांची स्वये.
नाते, स्नेह, निदान ओळख जरी येथे मला आणिती,
होतो मी तर पाद सेवुनि तुझे रम्य स्थळी या कृती!

चित्ती कल्मष ज्याचिया वसतसे ऐशा जनालागुनी
या चिन्हांतुनि हा निषेध निघतो आहे गमे मम्मनी -
“जा मागे अपुल्या, न दृष्टि कर या द्वाराकडे वाकडी,
पापेच्छूवरि हे सुदर्शन पहा आणील की साकडी!”

“आहे निर्मल काय अन्तर तुझे? मांगल्य की जाणसी?
लोभक्षोभजये उदात्त हृदयी व्हायास का इच्छिसी?
ये येथे तर, या शुभाकृति मनी घे साच अभ्यासुनी.”
आर्ये! स्वागत हे निघे सरळ या त्वल्लेखनापासुनी.

साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे,
नित्याच्या अवलोकने जन परी होती पहा अंधळे!
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणे तयी शाहणे,
कोठें स्वर्गसमक्षता प्रगटते हे नेहमी पाहणे!

## निद्रामग्न मुली!

निद्रामग्न मुली! तुझे मुख अहा! हे रम्य आहे किती!
ते साधेपण, नम्रता, मधुरता, शांती तिथे शोभती!
कौमार्ये नवयौवना न अजुनी थारा दिला वाटते,
स्वर्गातील तरीच मुग्धतरता या त्वन्मुखी राहते.

कोणी येथ जरी मनुष्य नसते, किंवा तुझा हा लय
ब्रह्मानंदनिमग्न - यास नसते नासावयाचे भय,
तूझे कोमल हे कपोल - मधुनी जे भासते हासती,
होतो मी तर त्यांस वत्सलपणे चुंबून बाले! कृती.

ऐसे मी म्हणतो म्हणून ठपका कोणी न ठेवी मला,
का की फारच ओढिते तव गडे! कौमार्ये मददृष्टिला.
यासाठीच तसे वदून चुकलो तूते स्वसा मानुन;
पापेच्छेस शिवाय चोदक नसे देही तुझ्या यौवन.

हा जो मी कवितेत गे द्रवुनिया गेलो तुला पाहता,
याचे कारण फार भिन्नच असे ते सांगतो मी अता -
ताई गे! तव या अनिश्चित जगी होईल कैशी दशा,
मी शोकाकुल होउनी गद्धनिया गेलो विचारी अशा.

थोडयाशा दिवसांमधेच तव हे कौमार्य गे जाइल
लज्जारोधितलोललीचन असे तारूण्य ते येईल;
त्याची फुल्ल विलोकुनी विकसने डोळे दिपूनी तव,
या लोकाविषयी विचार तुजला येतील कैसे नव? –

"नाना भोगनियुक्त गोड किति हा संसार आहे बरे?
जन्मापासुनि का तो वितरिला आम्हांवरी ईश्वरे?"
नाना क्लृप्ति कदाचित तुझ्या चित्तात त्या येतिल;

जाताना परि लौकिकानुभव तो तू कायसा नेशिल?

ज्या ह्या आज अजाणतेपण असे गाली तुझे शोभते,
ही शोभा अथवा अजाणपण ज्या गाली भले दाविते,
त्या गाली कटु जाणतेपण पुढे ओढील ना नांगर! –
त्या तासांवर जाणतेपण तसे बैसेल ना भेसूर!

ह्या तूझ्या मधु रे! मुखी मधुरशा त्या सर्वही भासती
चेतोवत्ति समप्रमाण, न दिसे भारी अशी कोणती;
काहीका दिवशी तुला जर गडे! ठेलो पहाया जरा,
सदवृत्तीसह या तुला फिरूनि मी वाचीन का चेहरा?

राहो हे सगळे, अशी कुळकथा नाही मुळी संपणे,
तू माझी भगिनी! म्हणूनि तुजला आशी असे अर्पिणे -
हे माझे भगिनी! दिनानुदिन गे दुःखे अम्हां घेरिती,
त्यांते हाणुनिया सुखे तुज सदा भेटोत ती राखिती!

## सिंहावलोकन

मुखा फिरवुनी जरा वळुनि पाहता मागुती
कितीक हृदये वदा! चरकल्याविणे राहती?
'नको वळुनि पाहणे' म्हणुनि दृग जरी आवरू,
धुके पुढिल जाणुनी मन न घे तसेही करू!

प्रदेश किति मागुते रूचिर ते वरे टाकिले,
कितीक तटिनीतटे श्रम जिथे अम्ही वारिले;
किती स्मृतिस धन्यतास्पद वनस्थली राहिल्या,
जिथे धवलिता निशा प्रियजनांसवे भोगिल्या.

सुखे न मिळतील ती फिरूनि! – ती जरी लाविती
मनाला चटका, तरी नयन त्यांवरी लोभती;
परंतु हृदयास जे त्वरित जाउनी झोंबती,
प्रमाद दिसता असे नयन हे मिटू पाहती.

किती घसरलो! किती चुकुनि शब्द ते बोललो!
करूनि भलते किती पतित हंत! हे जाहलो!
स्वयं बहकुनी उगा स्वजनमानसे टोचिली!
वृथा स्वजनलोचनी अहह! आसवे आणिली!

चुकोनि घडले चुको! परि, 'असे नव्हे हे बरे'
वदूनिहि कितीकदा निजकरेचि केले बरे!
म्हणूनिच अम्हांपुढें घनतमिस्त्र सारे दिसे,
पुढे उचलण्या पदा धृति मुळीहि आम्हां नसे

'चुकी भरूनि काढणे फिरूनि, हे घडेना कधी',
विनिष्ठुर असे भरे प्रगट तत्त्व चित्तामधी!
म्हणूनि अनिवार हे नयनवारि जे वाहते,
असे अहह! शक्त का कणवही टिपायास ते?

## एका भारतीयाचे उदगार -

संध्याकाळी बघुनि सगळी कान्ति ती पश्चिमेला
वाटे सद्यःस्थितिच अपुली मूर्त ती मन्मनाला;
'हा! हा! श्रीचा दिवस अपुल्या मावळोनी प्रतीचे
गेला! गेला!' सहज पडती शब्द हे मन्मुखाचे.

तेणे माथे फिरूनि सगळे जे म्हणोनि दिसावे,
त्यात्यामध्ये स्वजनकुदशा वाचुनी मी रडावे!
'जे जे चित्ती बहुतकरूनी ते सुषुप्तीत भासे'
वृध्दांचे हे अनवितथ हो वाक्य होईल कैसे?

प्रातःकाली रवि वरिवरी पाहुनी चालताना,
होई मोदातिशय बहुधा सर्वदा या जनांना;
पूर्वीची तो स्थिति परि करी व्यक्त ती वाचुनिया
एकाएकी हृदय मम हे जातसे भंगुनीया!

'हा जैसा का रवि चढतसे त्याप्रमाणेच मागे
स्वोत्कर्षाचा रविहि नव्हता वाढता काय? – सांगे;
जावोनी तो परि इथुनिया पश्चिमेशी रमाया,
ऱ्हासाची ही निबिड रजनी पातली ना छळाया!'

वल्लींनो! ही सुबक सुमने काय आम्हांस होत?
युष्मदगाने मधुर, खग हो! या जना काय होत?
आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळे हो!
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळे हो!

आहे आम्हांवर जव निशा पारतंत्र्यांधकारे,
वाहे जो का उलट कुदशेचे तसे फार वारे,
सौख्याचे तोवरि फुकट ते नाव व्हावे कशाला?
दुःखाचा तोवरि खचित तो भोग आहे अम्हांला!

आनंदाचे समयि मजला पारतंत्र्य स्मरून
वाटे जैसे असुख, तितुके अन्य वेळी गमे न!
पाहोनीया विष जरि गमे उग्र ते आपणाते,
अन्नामध्ये शतपट गमे उग्रसे पाहुनी ते!

देवा! केव्हा परवशपणाची निशा ही सरून
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून?
केव्हा आम्ही सुटुनि सहसा पंजरातूनि, देवा!
राष्ट्रत्वाला फिरूनि अमुचा देश येईल केव्हा?

## गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून

येथे होता राहत माझा स्नेही,
स्नेह्यांसाथी जो या लोकी राही;
पाशांला जो तोडायाला पाही,
स्वदेशपाशी अपणा बांधुनि घेई.

पाशांविण या कोठे काही नाही;
पाशांकरिता चाले अवघे काही.
पाशांतुनि या सुटता सुंदर तारे,
तेज तयांचे विझुनि जाई सारे.

चंद्राने या सदैव पृथ्वीपाशी
राहुनीच का सेवावे सूर्याशीं?
शक्त जरी का असेल तो, तरि त्याने
सेवावा रवि खुशाल निजतंत्राने.

सोडी पत्नीपाशाची तो आस,
स्वदेशसेवेकरिता घाली कास;
तो मत्सख निज गावी गेला आहे;
खोलीला या कुलूप लटकुनि राहे.

येथे गोष्टी आम्ही करीत होतो,
होतो, विद्याभ्यासहि करीत होतो;
मित्रत्वाचे बीज पेरूनी खासे
मैत्रीवल्ली वाढविली सहवासे.

देशाविषयी गोष्टी बोलत येथे
बसलो विसरूनि कितीकदा निद्रेते;
श्वासी अमुचे श्वास मिळाले जेव्हा,
अश्रूंमध्ये अश्रु गळाले तेव्हा.

ऐसे असता पहाट भूपाळ्यांला
पक्षिमुखांही लागियली गायाला;
हवा चालली मंद मंद ती गार,
प्रभाप्रभावे वितळे तो अंधार;

तेव्हा आम्ही म्हटले, ‘ही ऱ्हासाची
रजनी केव्हा जाइल विरूनि साची?
स्वतंत्रेची पहाट ती येईल,
उत्कर्षाचा दिन केव्हा सुचवील?

या डोळ्यांनी पहाट ती बघण्याचे
असेल कां हो नशिबी दुर्दैव्यांचे?
किंवा तीत आणायाचे काही
यत्न आमुच्या होतिल काय करांही?’

असो यापरी आम्ही प्रश्न अनंत
केले, होउनि कष्टी, परस्परांत;
‘इच्छा धरिता मार्ग मिळे आपणाला’
या वचने मग धीर दिला चित्ताला.

कोठे असशिल आता मित्रा माझे?
करीत असशिल काय काय ती काजे?
देशासाठी शरीर झिजवायाला
स्फूर्ती आणित असशील का कोणाला?

तुझी बघुनि ही मित्रा खोली बंद
विरहाग्नीने भाजे चेतःकंद;
पुनरपि आपण येथे भेटू ऐशी
आशा होई जलधारा मग त्यांसी.

झाल्यानंतर अस्त तो कमल ते पाहूनिया लागले,
‘उद्या मित्र करील तो निजकरे येऊनि याला खुले,’

ऐसे बोलुनि ज्यापरी त्रमर तो जातो भ्रमाने दुरी,
जातो बोलुनि या स्थलासहि तसे, मित्रा! अता मी घरी.

## रूढि - सृष्टि - कलि (?)

अज्ञाने फुगली, कुरूप अगदी झाली, दुरी चालली
सृष्टीपासुनि रूढी; ती मग असतसिंहासनी बैसली.

सारे लोक पहा! परंतु तिचिया पायी कसे लागती,
ही कन्या दितीची असूनि इजला देवीच की मानिती!

देते शाप जनांस घोर, जुलमी ही दुष्ट राणी जरी,
ती आशीर्वचने शुभेच गमती या मूर्ख लोकां तरी!

सृष्टीचे अमृतध्वनी दुरूनि जे कानांवरी त्यांचिया
येती, ते परिसूनि मूर्ख सगळे घेतात चित्ती भया!

सृष्टीने निज भृत्य एक बलवान रूढीवरी प्रेषिला,
त्याला लौकिक मूर्ख हा ‘कलि’ अशा नावे म्हणू लागला!

त्याने कागद घेउनी सहज ते रूढीकडे फेकिले,
त्यांही आसन ते तिचे डळमळू आहे पाहा लागले!

यवो तूर्ण कले! तुझ्या विजय तो अस्त्रांस त्या कागदी,
गाडू ही मग रूढि विस्मृतिचिया त्या खोल खादयामधी!

साधो! नाव तुझे खचीत बदलू, बोलू न तूते ‘कली’
जैजैकारूनि सृष्टिला, ध्वनि तिचा तो एक मानू बली!

## मजुरावर उपासमाराची पाळी

धारेवरी जाउनि देव पोचला,
हा रूंगही मावळतेस साजला;
सर्वत्र ही माज पहा! दिसे; परी
माझ्याच का दुःख भरे बरे उरी?

साऱ्या दिनी आजचिया नसे मुळी
हातास माझ्या कवडीहि लाभली;
पोटा, करोनी मजुरीस, मी भरी;
कोणी दिले आज न काम हो परी!

ही मंदिरे हो खुलतात चांगली;
माझ्या वडिलींच न काय बांधिली!
मी मात्र हो आज मरे भुकेमुळे;
श्रीमंत हे नाचति मंदिरी भले!

हेवा तयांचा मजला मुळी नसे,
जाडी मला भाकर ती पुरे असे;
कष्टात देवा! मरण्यास तत्पर,
का मारिसी हाय! भुकेमुळे तर?

सर्वास देवा बघतोसि सारखा,
होतोस का रे गरिबांस पारखा?
काहींस सुग्रास सदन्न तू दिले
साधी अम्हा भाकरही न का मिळे?

घेवोनि चारा आपुल्या पिलांप्रती
जाती अहा! पक्षि सुखी घरी किती;
बाळांस हे दावुनि कारभारिण
कैसे तया देत असेल सांगुन?

“पक्षी जसे हे घरटयास चालती
घेवोनि चारा अपुल्या पिलांप्रती,
घेवोनि अन्ना, तुमचा तसा पिता
येईल तो लौकरि हो, रड्र नका!”

हे लाडके! आणिक लाडक्यांनो!
दावू तुम्हां तोंड कसे फिरोन?
जन्मास मी काय म्हणोनि आलो?
येताच वा का न मरोनि गेलो?

## **"कोणीकडून! – कोणीकडे!"**

कोणीकडून? कोणीकडे?
'इकडुनि - तिकडे' म्हणती गडे!
येथुनि - तेथे, मागुनि पुढे
हे तर नित्यच कानी पडे;
पण समाधान का कधी तयाने घडे? – जिवलगे!

कोणीकडे ग कोणीकडून?
तिमिरामधेच तिमिरामधून;
घडीभर पडे मध्येच ऊन
भ्रमी तेही जाते उडून,
हृदय हे उले त्यामुळे निराशा जडून! जिवलगे!

भोगांची अवशिष्टे तुसे
घशात खुपती, लागे पिसे;
मागे पुढे न काही दिसे,
संशयडोही नाका फसे;
मग वदे 'हरे राम रे! करावे कसे?' जिवलगे!

गोत्यात अशा आलो कुठून
कोठे जाइन कैसा सुटून? –
असे विचारी जेव्हा झटून
भ्रमबुदबुद तो जातो फुटून;
मग अहा विभिन्नच दिसे दृष्टि पालटून! जिवलगे!

शून्य म्हणू जे मागे पुढे,
त्यातुनि दीप्ती वृष्टी पडे,
मधला उजेड तिमिरी दडे;
निजधामाहुनि आलो, गडे,
तर ऋणे फेड, चल सुखे स्वधामाकडे, जिवलगे!

# म्हातारी

घेउनि हृदयाशी सुतेला, स्थिन मी दाराशी,
म्हातारी आली तरंगत, मुलगीला दिसली.
हात पुढे केले धराया तिला तिने अपुले;
तिच्या शिरावरूनी तधी ती गिरक्या घे उडुनी,
हसत वरी करूनी हात ती धरू झटे फिरूनी;
त्या चलने वरती उडाली म्हातारी परती.
खिदळत ते बघता उडाली पाही मम दुहिता!
दडपण संसृतिचे निघाले मम चित्तावरचे
मन्मनही लागे तरंगू म्हातारीसंगे!
वारा तो तिजला लागला दूरच न्यायाला.
चुंबुनि वत्सेला वदे मी मग म्हातारीला :-

थांब! थांब! जाशी अशी का? फिर, ये गे मजशी;
वयस्कता माझी म्हणुनि जर करिसि इतराजी.
तर माझी सोनी पाहुनी ये गे परतोनी!
तुजला पाहू दे तियेला खिदळत राहू दे!
मज वय विसरू दे मुग्ध मधु बाल्यी उतरू दे!
ते दिन पुष्पांचे, कोवळ्या किरणी खेळाचे!
हे दिन - हाय! –
हे दिन चिंतांचे परंतु लटिके हसण्याचे!
हे दिन - जाऊ दे - मला तुज गाणे गाऊ दे.
म्हणती म्हातारी तुज, कधी होतिस तरूण परी?
तव जनि - मृति न दिसे अजामर रूप तुझे भासे!
कोठूनि तू येसी न वदवे, कोठे तू जासी;
स्वैरपणे भ्रमसी यदृच्छा मूर्तच तू गमसी!

येशी तू का गे? यक्षिणी कुंजातुनि? सांगे
कैशा वागुनिया मिळवती अक्षय यौवन त्या?
झिजवित नित्य जिणे तयाला पडते का मरणे?

वद त्याची रीति व्यावया आम्ही लागू ती.
वा गंधर्वांचे विमानच सूक्ष्मरूप साचे
वद असशी का तू तरंगत वातावरणातून?
सूक्ष्म देह धरूनी असति का तुजवरि ते बसुनी?
दिव्य असे गाणे गात ते असतिल सौख्याने,
ते मज पाप्याला कशाचे ये ऐकायाला!
परि मम वत्सेते गमे ते परिसाया मिळते;
म्हणुनिच उल्हासे अशी ही वेडावुनि हासे!

अज्ञातामधला मूर्त तू गमसी ध्वनि मजला;
अर्थ तुझा कोण मला तो देइल सांगोन?
कळेल जर मज तो? तर जगी भरला जो दिसतो -
मी तो अंधार लोपवू झटेन साचार!
खपुष्प तू असशी काय गे - सांगुनि दे मजसी.
तुझे रंग वास न कळती मर्त्य मानवास.
जर ते कळतील तर इथे स्वर्गच होईल!
मग तुज धरण्याते मुलांपरि मोठे झटतिल ते!

स्वरूप सत्य तुझे मुळीही ते मजला नुमजे;
तरी तुझ्या ठायी वसतसे अदभुत ते काही.
प्रत्यक्षातुनि ते परोक्षा शीघ्र मला नेते;
तेथे स्वच्छंदे विचरता मोह मनी कोंदे
मग गणमात्राते जोडणे केशवपुत्राते

## हरपले श्रेय

त्रिखंड हिंडुनि धुंडितसे,
न परि हरपले ते गवसे                    धृ

होत्ये अजाण माहेरी
तो खेळ खेळल्ये परोपरी;
लट्टूपटीच्या घरदारी
लटकीच जाहल्ये संसारी
तेव्हाचे सुख ते आता
खऱ्या घरीहि न ये हाता!

        चुकचुकल्यापरि
        वाटे अंतरि
        होउनि बावरि
निज श्रेय मी पाहतसे
न परि हरपले ते गवसे!                    १

'प्राप्त जाहले ते तुजला
तू मागितले जे देवाला;
ज्याचे मोल तुवा दिधले
तेच तुझ्या पदरी पडले.'
या वचने चुकला सौदा
उमगुनि हृदया दे खेदा.
दिले हिरण्मय
हाती मृण्मय
हा! हतविनिमय!
परत मला मम मिळे कसे?
न परि हरपले ते गवसे!                    २

किरण झरोक्यातुनी पडे
अणूसवे त्यातून उडे;

परोक्षविषयी मन माझे
विसरूनिया अवधी काजे;
हयगय त्यांची मज जाची
परि न मला पर्वा त्याची.

वेडी होउन
बसल्ये अनुदिन
एकच घेऊन
मज माझे लाभेल कसे?
न परि हरपले ते गवसे! ३

जेथे ओढे वनराजी,
वृत्ति रमे तेथे माझी;
कारण काही साक्ष तिथे
मग त्या श्रेयाची पटते;
म्हणुनी विजनी मी जात्ये,
स्वच्छंदे त्या आळवित्ये.
स्वभास दावुनि
परि ते झटदिनि
जाई लोपुनि
मग मी हाका मारितसे!
न परि हरपले ते गवसे! ४

भीडभाड माझी फिटली
जग म्हणते की 'ही उठली!'
जनमर्यादा धरूनि कसे
अमर्याद ते मज गवसे!
एक शब्द बोलेन जरी
सकला कुंठित करिन तरी!
अशी आगळी
परी बावळी

आहे दुबळी,
का की त्याविण सुचत नसे;
न परि हरपले ते गवसे!

स्वपतिचितेवरी उडी सती
संसृतिविमुखी घेई ती;
दीपशिखेवरि पतंग तो
प्रेमे प्राणाहुति देतो;
मी न करिन का तेवि तधी
माझे मज लाभेल जधी
मजपासोनी! हाय! हिरोनी! नेले कोणी -
म्हणुनि जी पाखडीतसे -
न परि हरपले ते गवसे! ६

## स्फूर्ति

काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या!
प्राशन करिता रंग जगाचे क्षणोक्षणी ते बदलू द्या!
अमुच्या भाळी कटकट लिहिली सदैव वटवट करण्याची,
म्हणेल जग आम्हांस मद्यपी, पर्वा कसली मग याची?
जिव्हेची बंधने तर ढिली करा तीव्र या पेयाने,
यदुष्णतेने द्यावापृथ्वी द्रवुनि मिसळती वेगाने!
        होउनिया मग दंग मनी
        व्हावे ते आणा ध्यानी
        गा मग सुचतिल ती गाणी
परिसुनि त्यांचे शब्द रूढिचे दास झणी ते खवळू द्या!
काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या! १

सोमाचा रस वेदकाळच्या ऋषिवर्यांनी उकळीला,
शेष तयाचा द्या तर लौकर पिपासु जे त्या आम्हांला!
औचित्याच्या फोल विवेका! जा निघ, या दुरवस्थेने
अम्हां घेरिले म्हणुनी घेतो झिंगुनिया या पानाने!
क्लृप्तीची मग करूनी नौका व्योमसागरावरि जाऊ,
उडुरत्ने या गरिब धरेला तेथुनि फेकुनिया देऊ!
        अडवतील जर देव, तरी
        झगडू त्यांच्याशी निकरी,
        हार न खाऊ रतीभरी,
देवदानवा नरे निर्मीले हे मत लोका कवळू द्या
काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या! २

पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे,
टेकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुनिया देउ कसे!
बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देउनि जुलुमाचे या करू पहा तुकडे तुकडे!

‘महादेव हरहर’ समराचा गर्जत तो वाऱ्यावरती
येउनि घुमतो अमुच्या कर्णी, ‘निजती ते ठारचि मरती!’
उठा! उठा! बांधा कमरा!
मारा किंवा लढत मरा!
सत्वाचा ‘उदयोऽस्तु’ करा!
छंद फंद उच्छृंखल अमुचे स्तिमित जगाला ढवळू द्या!
काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या! ३

.

## दिवाळी

विश्वेशे करूनी कृपा सकरूणे दुष्काळदैत्यावरी
पर्जन्यास्त्र नियोजुनी पळविली आहेत दुःखे दुरी;
आता मंगल पातले दिवसही दीपोत्सवाचे भले,
गाणे सुखर पाहिजे तर तुवा हे शारदे! गाइले.

दीने ज्याविण वाटतात सुदिने साऱ्याहि वर्षातली,
नावाने जरि दुर्दिने, सुखद जी होती पुढे चांगली,
ती येऊन बरीच, वृष्टि करूनी त्यांही दिली भूवरी,
तेणे सांप्रत पाहता दिसतसे सृष्टी अहा साजिरी.

सस्यांचा बरवा अनर्घ्य हिरवा शालू असे नेसली,
जाईची जुइची गळा धरितसे जी रम्य पुष्पावली,
ती भाळी तिलकांकिता शशिमुखी आता शरदसुंदरी,
माथा लेवुनि केवडा विचरते, घेऊनि पद्मे करी.

जो गोपाळ गमे प्रभातसमयी गायी वनी चारिता,
वाटे रव्युदयी नदीवर मुनी अर्ध्यास जो अर्पिता,
जो भासे दिवसा कृषीवल शिरी खोबूनिया लोंबरे,
तो आता ऋतु शारदीय बहुधा शेतातुनी संचरे.

राजा जो धन्यधान्यदायक असे साचा कुबेरापरी,
त्या श्रीमंडित शारदीय ऋतुची राणी दिवाळी खरी;
रूपैश्वर्यगुणाढय ती जवळ ये; द्याया तिला स्वागता
सारेही शुभयोजनांत गढले - काही नुरे न्यूनता.

भिंती रंगविल्या नव्या फिरूनिया, केली नवी आंगणे
वीथी झाडुनि, रान काढुनि दिसे सर्वत्र केराविणे;

दारी उंच दिले दिवे चढवुनी, हंडया घरी लाविल्या,
लोकी शक्त्यनुरूप आत्मसदनी भूषा नव्या जोडिल्या.

बाजारात जमाव फार मिळुनी गर्दी उडाली असे,
गंध्याला निजसंग्रहास विकिता विश्राम काही नसे;
उंची कापड, दागिने सुबकही, मेवे, फटाके चिनी,
यांचा विक्रय होतसे धडकुनी, वस्तू न चाले जुनी.

माहेराप्रत कन्यका स्मितमुखी उत्कंठिता पातल्या,
त्या मातापितरां सहर्ष दुहिता, भावां स्वसा भेटल्या;
आले सांप्रत भेटण्यास वडिलां दूरस्थ ते पुत्रही,
सोहाळे श्वशुरालयी अनुभवू आले नवे जावई!

बाळांही निजपुस्तकांस अवघ्या आहे दिलेली रजा,
काही काढुनि खेळ, नाचुनि मुले ती मारिताती मजा;
तो गेहामधुनी खमंग निघुनी ये वास, तेणे उगी
तू होऊन, हळूच आत शिरती, 'दे माउली वानगी!'

आता भौमचतुर्दशी पुडलिया वारी असे पातली,
तो रात्री निजता बनी चिमुकली मातेप्रती बोलली :-
"माला आइ उथीव लौकल बले, अंगास मी लाविन
दादाच्या म्हनुनी गले! उथव तू हाका मला मालुन!"

सारेही पहिल्या दिनी उठुनिया मोठया पहाटे जन
स्नाने मंगल लौकरी उरकिती सौगंधिके चर्चुन;
ज्या ठायी असती दिवाळसण ते, थेथून वाद्ये पाहा
निद्रेतून दिवाळिला उठविण्या ती वाजताती अहा!
.
त्यांच्या मंजुरवे न जागृत झणी होईल ती वाटले,
यालागी शिलगावुनी जणु गमे देती फटाके मुले.
'ठोठो' आणिक 'फाडफाड' उठती तो नाद अभ्यंतरी
त्याही सत्वर जाहली हसत ती जागी दिवाळी पुरी.

रांगोळ्या रमणीय काढुनि पहा त्या मांडल्या पंगती,
पक्वान्ने कदलीदलांवरि अहा! नेत्रांस संतोषिती;
पाटांच्या मधुनी जलार्थ असती पात्रे रूप्याची तिथे
नेसूनी जन मोलवान वसने होतात की बैसते.

घेऊनी घृत, दुग्ध ते विपुल ते गोधूमही, साखर,
प्रेमाने महिलाजनी बनविली खाद्ये किती सुंदर;
त्यांची सांप्रत रेलचेल अगदी पात्रात जी होतसे,
तृष्टी आणिक पुष्टी ती वितरूनी प्रीति दुणावीतसे

रांगोळ्या दिसती प्रदोषसमयी दारापुढे काढिल्या,
दीपांच्या सदनापुढे उजळुनी पंक्ती तशा लाविल्या,
त्यांच्या ज्योति असंख्य त्या बघुनिया वाटे असे अंतरीः-
तारा या गगनातुनी उतरल्या की काय भूमीवरी!

बाळे सर्व फटाकडया उडविती चित्तात आनंदुनी,
जाडे बारहि लाविती, धडधडा त्यांचा उठे तो ध्वनी,
मोठे बाणहि, चन्द्रज्योति मधुनी, त्या फूलबाज्या, नळे
दारूकाम असे अनेकविध ते दृष्टी पडे, लाविले.

लक्ष्मीपूजन ते द्वितीय दिवशी रात्रौ जधी होतसे;
सोने आणि वह्या धनीजन तशी मांडून अर्चीतसे;
साध्याला विसरून लोक धरिती भक्ती कसे साधनी
ये हा आशय अर्थहीन कविच्या चित्तात ते पाहुनी!

आता भार नसे कुणास, पण तो शिंक्यास भारी असे;
हातां काम नसे, परंतु पडते तोंडास ते फारसे;
कोणा मार नसे, तरी पण शिरी तो सोंगट्यांच्या वसे;
कोणा त्रास नसे, परंतु नयना तो जोगरे होतसे.

भ्राते ते भगिनीगृहाप्रति सुखे जाती बिजेचे दिनी
त्यांचा बेत सुरेख ठेवुनि तया ओवाळिती भामिनी;

तेही त्यांस उदार होउनि मनी ओवाळणी घालिती,
प्रेमग्रंथिस दार्ढ्य बंधुभगिनी या वासरी आणिती.

खाणे आणि पिणे, विनोद करणे, गाणेहि वा खेळणे,
जैसे ज्यास रूचेल त्यापरि तुम्ही या उत्सवी वागणे;
मी संध्यासमयी खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी!

## फुलपाखरू

जेथे हिरवळ फार विलसते
लताद्रुमांची शोभा दिसते,
तेथे फुलपाखरू पहा हे सुंदर बागडते! १

कलिकांवरूनी, पुष्पांवरूनी,
गंधयुक्त अवकाशामधुनी,
पुष्पपरागा सेवित हिंडे मोदभरेकरूनी! २

तरल कल्पना जशी कवीची,
सुंदर विषयांवरूनी साची
भ्रमण करी, गति तशीच वाटे फूलपाखराची! ३

या मुग्धेची जैशी वृत्ति
पतिसहवासस्वप्नावरती
विचरे फुलपाखराची तशी हालचालही ती! ४

निर्वेधपणे इकडे तिकडे
वनश्रीतुनी अहा! बागडे;
साचा हेवा हृदयी उपजुनि मन होई वेडे! ५

तिमिरी आम्ही नित्य रखडणे,
विवंचनांतचि जिणे कंठणे,
पुष्पपतंगस्थिति ही कोठुनि आम्हांला मिळणे! ६

असे यास का चिंता काही
यास 'उद्या' चा विचार नाही,
अकालीच जो आम्हा न्याया मृत्युमुखी पाही! ७

बद्ध सौख्याची कुसुमित सृष्टी,

तीत वसे हे, न कधी कष्टी!
ग्रीष्माचे खर रूप विलोकी नच याची दृष्टी! ८

'सर्व विनाशी असती प्राणी'
ही मज खोटी वाटे वाणी;
फूलपाखरू - मरण पाहिले आहे का कोणी? ९

जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे,
गाणे मनात मम होय सवेचि जागे;
गातो म्हणून कवनी फुलपाखराते,
व्हायास सौख्य मम खिन्न अशा मनाते. १०

## संध्याकाळ

संध्याकाळ असे : रवी उतरतो आहे समुद्रावरी,
त्यांचे बिंब सुरेख चुम्बिल पहा लाटांस या लौकरी;
मातीला मिळुनी गळूनि पडले ते पुष्प जाई जसे,
लोपाला लहरीत मण्डलहि हे जाईल आता तसे.

आकाशी ढग हे पहा विखुरले, त्यांच्यावरी सुंदर
रंगाच्या खुलती छटा, बघुनि त्या येते स्वचित्तावर:-
हा मृत्युंगत होतसे दिवस, तन्मस्तिष्कपिंडावरी
येती अक्षयमोक्षसिंधुलहरी तेजोयुता यापरी!

पक्षी हे घरट्यांकडे परतुनी जातात की आपुले;
त्यांलागी किलबील शब्द करूनी आनंद देती पिले;
गायी कुरणातुनी परतता हंबारवा फोडिती,
त्यांचे उत्सुक वत्स त्यांस अपुल्या दीन स्वरे बाहती.

आनंदी दिसती युवे, फिरकती जे या किनाऱ्यावरी,
ध्याती ते निज सुंदरीस गमते, उल्हासुनी अंतरी;
जी ही मंदिरराजि पैल दिसते, तीच्या गवाक्षातुनी
झाल्या त्या असतील हृष्ट युवती चित्ती असे आणुनी:-

"अस्तालागुनि जातसे दिनमणी, रात्री अहा येतसे!
रात्री! जादु किती विलक्षण तुझे नामामधे गे वसे!
प्रेमाचे हृदयी उषी कुमुद जे संकोच गे पावले
देती त्यास विकास! चित्त म्हणुनी नाथाकडे लागले!"

संध्येला प्रणयी तुम्ही जन सुखे द्या हो दुवा; मी करी
हेवा तो न मुळी, नसे प्रणय तो माझ्याहि का अंतरी?
आहे मी घर सोडुनी पण दुरी; चित्ती म्हणूनी असे
मी संध्यासमयी उदास, - अथवा व्हावे तरी मी कसे?

## फुलातले गुण

बांधावरि झुडुप एक,
पुष्प तयावरि सुरेख
पाहुनि मी निजहृदयी मुदित जाहलो,
त्याजवळि चाललो!

जाउनिया त्या सुमनी
काय असे हे स्वमनी
मनन करित, उन्मन मी तेथ ठाक़लो
या पंक्ति बोललो -

पुष्पी या सुंदरता
फार असे, ती चित्ता
वेधुनि संसारताप सारिते दुरी,
उल्लसित त्या करी

पुष्पी या प्रीति असे,
ती मीपण हाणितसे,
परविषयी तन्मयता प्रेरिते उरी,
ने दृष्टी अंतरी!

मार्दवही यात फार,
कारज, निज मधु तुषार
ढाळितले स्वलतेच्या पल्लवी अहा!
ते द्रवतसे पहा!

सदगुणही यात वसे,
कारण की, तेज असे
तेथे स्मित करित सदा आढळे पुढे,
त्या तम न आवडे.

जादूही यात भरूनि
दिव्य असे, ती पसरूनि
निज धूपा वाऱ्यावरि, दश दिशा भरी,
बेहोष की करी!

यापरि मी उन्मनीत
होतो आलाप घेत;
आणिक या फुलामधी काय हो असे?
ते काय हो असे? –

तो जवळुनि मधमाशी
आली गुणगुणत अशी
“गाणे ते फुलामधे आणखी असे!”
ती बोलली असे!

पेल्यामधि पुष्पाच्या,
गुंगत ती त्याच वचा
शिरली; त्या वचनाची सार्थता भली
तो व्यक्त जाहली!

गुणगुणली मधमाशी
“पुष्पी गुण जे तुजसी -
आढळले, तुजमध्ये कितिक त्यांतुनी?
वा! घेइ पाहुनी!”

# पर्जन्याप्रत

ग्रीष्माने तपली धरा, करपली ही काय की, वाटते;
चारा व्यर्थ गुरे पहा हुडकती; नेत्री धुळी दाटते.

छायेला जल ते असे जर कुठे, फेसास त्या गाळित
त्या ठायी जमती गुरे, पथकही धापांस ते टाकित.

ऐशी होऊनिया दशा दिवस ते झाले बहु; पावसा!
ये आता तर तू त्वरा करूनिया लंकेवरूनी असा.

तुझ्या आगमनार्थ दुर्दरपती वापीतळापासुनी
रात्रीचे निजकंठशोष करिती हाका तुला मारूनी.

काकांही अपुली पहा घरकुले झाडांवरी डाळिली;
दाण्याने घरटी भरूनि चिमण्या यांही तशी टाकिली,

तू येणार म्हणूनिया वळचणीखाली गड्या! संप्रती
पाकोळ्याहि ‘फडक फडक’ करित या वस्तीस धुंडाळिती.

रात्रीच्या दिवटयाच ज्या तव अशा खद्योतिका यापुढे
झाल्या दाखल, पावसा! विरमसी तू सांग कोणीकडे?

रात्री त्या झुडुपांमधी चमकती जेव्हा तयांच्या तत्ती;
उत्कंठा तुझियाविशी अमुचिया चित्तामधे प्रेरिती.

भेटायास तुला समुत्सुक अशा मुंग्या उडू लागती;
पर्जन्या! तरे ये, कृषीवल तुझ्या मार्गाप्रती ईक्षती;

झंझावात ह्यावरी वसुनिया या पश्चिमाब्धीवरी
लाटा झोडित; गर्जना करित ये, बा मेघराजा, तरी!

## मयूरासन आणि ताजमहाल

कामे दोन सुरेस त्या नृपवरे केली :- मयूरासनी -
ज्या तो बैसुनि शोभला, प्रथम ते - सा कोटि ज्या लागले,
राजे ज्यापुढते जुळुनि अपुल्या हस्तद्वया वाकले,
झाले कंपित, तत्करी शिर असे येऊनिया हे मनी;
प्रेमे मंदिरही तसे निजसखीसाठी तये लावुनी -
कोटी तीनच त्या गभीर यमुनातीरावरी बांधिले,
चोरे आसन ते दुरी पळविले, स्मर्तव्य की जाहले!
आहे अदभुत तो महाल अजुनी तेथे उभा राहुनी!
विल्हेवाट अशीच रे तव कृती त्या सर्वदा पावती;
मत्त भ्रांत नरा! सदैव कितिही तू धूप रे जाळिला
स्वार्थाच्या प्रकृतीपुढे, निजमनी ही याद तू जागती -
राहू दे - तरि धूर होइल जगी केव्हाच तो लोपला!
काडी एकच गन्धयुक्त, नमुनी प्रीतीस तू लाव ती,
तीचा वास सदा जगी पसरूनी देईल तो तुष्टिला!

## चिरवियुक्ताचा उदगार

वृष्टीमागुनि चन्द्रकांतिधवला ती ये शरत साजिरी,
तैसा रम्य वसंत तीव्र शिशिरामागूनि तो येतसे;
सूतिक्लेश सरे, अनंतर सुखा ते तान्हुले देतसे,
पाणी ओसरता समग्र भरती येते पुन्हा सागरी.
द्युत्याविष्कृति मोक्षकाल करितो खग्रास झाल्यावरी,
कृष्णानंतर शुल्क पक्ष चढती तो कौमुदी घेतसे;
प्रातःकाल सुरेख गाढ रजनीमागून तो होतसे,
होता दारूण कल्प - अंत फिरूनी सृष्टि स्मिता आदरी!

या गोष्टी गणणे असे सुलभ गे त्याला जयाच्या मनी
आशातंतु नसे अजूनि तुटला; ते भाग्यशाली खरे!

कांते! मत्सम गे परंतु असती जे या अभागी जनी,
त्यांची वाट विपत्समाकुल जगी होणार कैशी बरे?
उत्कंठाज्वलने तुझा विरह हा टाकी मला पोळुनी
या गोष्टी गणता निराश हृदयी माझ्या भरे कापरे!

## राजा शंतनु

जा स्वस्थळास हरिणा! सुखे, पहा बाण घेतला मागे;
तुजमागे आलो, पण तव लिप्सा मन्मनी न ती वागे.

मृगयामिषे त्रिपथगातीरी एकांत साधुनी रानी
विचरावे स्वैरपणे, या गोष्टीची असे मज शिराणी.

ताते प्रतीपराये कथिले हिनगुज जे मला, तेणे
भ्रम जडला हृदयाला, अन्य विषय तो मुळीहि मी नेणे.

भ्रमहेतु तूच अससी गंगे! तव दर्शने अहा! भंगे -
ताप जनांचा, मग मम होती संतप्त केवि ही अंगे?

ममजनकदक्षिणांकी बैसुनि पूर्वी तुवाच ना त्यात
वचन दिले, 'तुमच्याशी सुनेचिया जुळिन साच नात्याते.'

ते देवि! स्मरसी की? पुसतो सुत मी प्रतीपराजाचा,
भ्रमवुनि मज कोठवरी दुःसह देसी मदंतरा जाचा?

मी मानव म्हणुनी तव शंकित जरि चित्त होय सुरसरिते!
तरि नच वचनविलंघन करि, मर्त्यालाहि हीन जे करिते.

देवेन्द्रतुल्य राजे इन्दुकुलोत्तंस विश्वसन्महित,
तद्वंशज मी असता शंकित व्हावे तुवा न हे विहित.

का मग विलंब करिसी? गुंतविते कोणते तुला काम?

धाम न रूचे, मज वनी फिरवी तव पाणिपीडनी काम.

ये, हो प्रकट लवकरी; पाहू दे दिव्य मूर्ति तव मग ती.
ज्योतिवरी शलभाची होऊ दे तेवि शीघ्र माम गती!

ये, ते! धीर न धरवे, करवेना काज मज पहा काही;
बाही तुज औत्सुक्ये; जाई नभ त्या भरून हाकाही!

## वियुक्ताचा उदगार

राहे नित्य वसुंधरेस धरूनी हा भाग्यशाली गिरी,
यालागी दयितावियोग न कधी माझ्यापरी जाचितो,
वेलेला लहरीकरी निरवधी हा अब्धि आलिंगितो;
कांतेपासुनि मी परी विचरतो या दूरदेशांतरी!
चित्रोल्लास चिर प्रकाश सुभगच्छायासखीशी करी;
त्यांचे संगमसौख्य पाहुनि मनी मी फार वेडावतो;
पोटाशी धरूनी सदा सुरधुनी आकाश हा नांदतो,
त्याचा मत्सर उग्र दंश करितो वेगे मदम्यंतरी.

तेणे व्याकुल होऊनी झडकरी मी झाकितो लोचने;
माया - ईश्वर, पूरूष - प्रकृतिही, वागर्थ ऐशी द्वये
सम्यग्युक्त बघून आत, उघडी त्रासून मी ईक्षणे,
तो नित्यद्युतिदेवतेसह रमे तो दृकपथी सूर्य ये!
त्यायोगे विरहाग्नि फार भडके, होते नकोसे जिणे;
आता हाय! न राहवे तुजविणे, कैसे करू गे सये!

## स्मरण आणि उत्कंठा

एकांती असता घरी तुज सखे ‘हे सारिके’ बाहिले,
‘हे माझे शुकराज’ हे म्हणुनि तू माते मिठी मारिली;

‘माझे जातिलते!’ म्हणून तुजला मी गाढ आलिंगिली,
तो ‘माझे सहकार’ हे मधुर गे तू नाम माते दिले.

‘माझे रम्य विहार - पुष्करिणि गे’ मी तूज संबोधिले,
‘माझे मानस - हंस हो!’ सरस हे वाणी तुझी बोलिली;

‘क्रीडासिंधुमधील हे मम तरी!’ ही साद मी घातिली,
‘माझे नाविक हो! प्रवीण’ म्हणुनी माते तुवा चुंबिले!

प्रीतीची सरिता उचंबळुनि त्या आसक्त संबोधनी,
ओघामाजि तिच्या प्रिये! उभयता तै पावलो मज्जन!

उत्कण्ठा हृदयात, ते स्मरूनिया संदीप्त ती होउनी,
रात्री या विरहे तुझ्या तळमळे हा मी अभागी जन!

घेई ध्यास तुझा म्हणून मज दे निद्रा गडे सोडुनी,
तेणे दुर्लभ गे! तुझे अहह! ते स्वप्नातही दर्शन!

# अढळ सौन्दर्य

तोच उदयाला येत असे सूर्य
अहो क्षितिजाला त्याच नव्हे काय?
तेच त्याचे कर न का कुंकुमाने
वदन पूर्वेचे भरिति संभ्रमाने?

तेच तरू हे तैशाच पुष्पभारे
लवुनि गेले दिसताच पहा सारे!
त्याच वल्ली तैसेच पुष्पहास्य
हसुनि आजहि वेधिती या मनास!

कालचे जे की तेच आज पक्षी
कालच्या हो ज्या त्याच आज वृक्षी
बसुनि गाती कालची तीच गाने
गमे प्रातः प्रार्थना करिति तेणे!

काल जो का आनन्द मला झाला
तोच आजहि होतसे मन्मनाला,
कालचा जो मी तोच हा असे का?
अशी सहजच उदभवे मनी शंका!

अशी सहजच उदभवे मनी शंका
काय समजुनि समजले तुम्हांला का,
असे अनुभव की रिझवि एकदा जे
पुन्हा बहुधा नच रिझो त्याच चोजे,

पुन्हा बहुधा नच रिझो त्याच चोजे;
कसे मग हे वेधिले चित्त माझे
आज फिरूनी या सूर्य - तरू - खगांनी
आपुलीया नवकांति - पुष्प - गानी?

म्हणुनि कथितो निःशंक मी तुम्हांते -
असे सुंदरता अढळ जरी कोठे
तर करी ती सृष्टीत मात्र वास
पहा मोहिल सर्वदा ती तुम्हांस.

## एक खेडे

सह्यगिरिच्या पायथ्याला सुपीक
रम्य खोरे कोकणामधी एक;
नदी त्यामधुनी एक वाहताहे,
एक खेडे तीवरी बसुनि राहे.

वरूनि सुंदर मंदिरे न त्या ठायी,
परी साधी झोपडी तिथे पाही,
मन्दिरांतुनि नांदते रोगराई,
झोपडयांतुनि रोग तो कुठुनि राही?

रोग आहे हा बडा की मिजासी,
त्यास गिर्द्यावरि हवे पडायासी;
झोपड्यांतिल घोंगड्यांवरी त्यास
पडुनि असणे कोठले सोसण्यास?

उंच नाहित देवळे मुळी तेथे,
परी डोंगर आहेत मोठमोठे;
देवळी त्या देवास बळे आणा,
परी राहे तो सृष्टिमधे राणा.

उंच डोंगर ते, उंच कडे भारी,
पडे धो धो ज्यांचियावरूनि वारी;
भोवताले रान ते दाट आहे;
अशा ठायी देव तो स्वये राहे!

स्तोत्र ओढे थांबल्यावीण गाती,
सूर वारे आपुला नित्य देती,
वृक्षगण तो नाचुनी डुल्लताहे;
अशा भक्तीच्या स्थळी देव राहे!

अशी नैसर्गिक भव्यता उदास
तया खेडयाच्या असे आसपास;
तसा खेडयाचा थाट तोहि साधा. .
भव्यतेला त्या करितसे न बाधा.

सरळ साधेपण असे निसर्गाचे
मूल आवडते, केवि ते तयाचे
भव्यतेला आणील बरे बाधा?
निसर्गाचा थाटही असे साधा.

लहान्या त्या गावात झोपडयांत
भले कुणबी लोक ते राहतात;
खपोनीया ते सदा सुखे शेती
सरळ अपुला संसार चालवीती.

अहा! अज्ञात स्थळी अशा माते
एक गवतारू खोप रहायाते,
शेतवाडी एक ती खपायाला
लाधती, तर किति सौख्य मन्मनाला!

तरी नसतो मी दरिद्री धनाने,
तरी नसतो मी क्षुद्र शिक्षणाने;
तरी होती ती स्वर्गसुखे थोडी,
तरी नसती कीर्तिची मला चाडी!

कीर्ति म्हणजे काय हो? एक शिंग:
प्रिय प्राणांही आपुलिया फुंक्र,
रखाडीला जा मिळुनिया वेगे;
शिंगंनादहि जाईल मरूनि मागे!

कीर्ति म्हणजे काय रे? एक पीस:
शिरी लोकांच्या त्यास चढायास

छरे पडती पक्ष्यास खावयास;
मागुनी ते गळणार - हेहि खास.

पुढे माझे चालेल कसे ऐशी
तेथ चिन्ता त्रासिती न चित्तासी.
नीच लोकांला मला नमायास
वेळ पडती थोडीच ह्या स्थळास!

शेत नांगरणे पेरणे सुखाने,
फूलझाडे वाडीत शोभवीणे;
गुरेढोरे मी बाळगुनी काही
दूधदुभते ठेवितो घरी पाही.

कधी येता पाहुणा जर घराला
'तुझे घर हे' वदतोच मी तयाला;
गोष्टि त्याच्या दूरच्या ऐकुनीया
थक्क होतो मी मनी तया ठाया.

'असे जग ते एवढे का अफाट!
त्यात इतुका का असे थाटमाट!'
असे वदतो मी त्यास विस्मयेसी,
स्वस्थिती तरि तुळितो न मी जगाशी,

स्वर्गलोकी संपत्ति फार आहे,
इथे तीचा कोटयांश तोहि नोहे;
म्हणुनि दुःखाने म्हणत 'हाय! हाय!'
भ्रमण अपुले टाकिते धरा काय?

तरी, स्वपथा जातात सोडुनीया
कुणी तारे तेजस्वि फार व्हाया;
तधी तेजाला लोळ दिसे साचा,
परी अग्नी तो त्यांचिया चितेचा!

वीरविजयांच्या दिव्य वर्तमानी
कृष्ण कदने पाहतो न त्या स्थानी;
भास्कराच्या तेजाळपणी माते
डाग काळे दिसते न मुळी तेथे!

सूर्यचन्द्रादिक दूर इथुनि तारे
तसे जर हे मानितो अलग सारे,
जसे नेच्छू त्यावरी चढायास,
इच्छितो नच या जगी यावयास!

तेथ गरजा माझिया लहान्या त्या
सहजगत्या भागुनी सदा जात्या;
म्हणुनि माझे जग असे तेचि खोरे
सुखी मजला राखिते चिर अहा रे!

# भृंग

भृंगा! दंग अहा! होसी,
गुंगत धाव वनी घेसी;
तुजमागुनि वाटे यावे,
गोड फुले चुंबित गावे!

रवि येत असे उदयाते,
अरूणतेज विलसित दिसते,
तरी तिमिर हे विरल असे,
धुके भरूनि न स्पष्ट दिसे!

कविच्या हृदयी उज्ज्वलता,
आणिक मिळती अधुंकता;
तीच स्थिति ही भासतसे,
सृष्टी कवयित्रीच दिसे!

तिच्या कल्पना या गमती
कलिका येथे ज्या फुलती,
सुगंध यांतुनि जो झुकतो
रस त्यातिल तो पाझरतो!

भृंगा! आणि तुझे गान
सृष्टीचे गमते कवन!
गा! तू गा! नादी भ्रमरा!
मी गणमात्रा जुळणारा!

शुक पंजरबंधी घालू,
त्या पढवू नरवाक बोलू;
श्रुतिवैचित्र्या बघणारे
आम्ही मात्र जुळणारे!

‘कवि’ आम्हांलागुनि म्हणणे
कविशब्दार्था लोळविणे!
अस्मदगान नव्हे ‘गान’,
ते गाना चिंध्यादान!

परंतु भृंगा! तव गान
परमानंदे परिपूर्ण!
उदासीन ही जगाविशी
तव तन्मयता सृष्टीशी!

अस्मदीय हृदयी ठरले
की जग हे दुःखे भरले!
म्हणुनी सुंदरतेलाही
कुसे अम्हा दिसती पाही!

परि तव गानातून अले!
थबथबला हा भाव गळेः-
‘गुङ गुङ गुङ गुङ - भान नसे!
सृष्टी अहा - गुङ! मधुर असे

दुःख वदा ते केवि असे?
अश्रू - ते हो काय? कसे?
फुले फुलति, परिमल सुटती,
रस गळती गुङ सौख्य किती!’

जाइ, जुई, मोगरी भली,
कमलिनीहि सुंदर फुलली;
मधु यांचा सेवुनि गोड
पुरवी तू अपुले कोड!

प्रीति, चारूता, आनन्द
यांचे गा मधुरच्छंद;

प्रीति, चारूता, आनन्द
सिंपिति सृष्टीचा कंद!

वरूनि नभातुनि चंडोल
ओतितसे हेची बोल;
खाली तव गुंजारव हा
प्रतिपादितसे तेचि अहा!

होईल का रसिकता तव लब्ध माते?
गुंगी मिळेल मजला तव केधवा ते?
येते मनात तुझियासम भृंग व्हावे,
वेलीमधूनि कलिकांवरूनी झुकावे!

## फुलांची पखरण

टिप फुले टिप! माझे गडे ग! टिप फुले टिप!
पाहा फुलांची पखरण झिप! ध्रु

किती सुखाची सकाळ,
किति मौजेची ही वेळ,
दिशा या फाकती,
फुले ही फुलती,
पक्षी हे बोलती;

सगळ्याही सृष्टिने पाहा निद्रा टाकिली,
प्रीती तो आशेसंगे खेळाया लागली;
तर आनंदे या झाडाखाली
टिप फुले टिप! पहा. १

किती सकाळ ही सुंदर,
जसे मुलींचे माहेर;

जगाचे ते व्याप
दुरि तैसे संताप,
मनि न शिरे मुळि पाप;

पुण्याची ही वेळ पहा गे! सूर्याने उजळीली,
आशेचिया ग! वेलीवरती गाणी ती फुलली;
तर मौजेने या वेळीखाली
टिप फुले टिप! पाहा. २

सकाळ जाइल संपून,
मग तापेल ते ऊन;
मग धन्दे कराल,
पण, फुले ही विसराल!
सुख कैसे पावाल?

फिरूनी ऐशी वेळ गडे ग! कधि तरि ती येइल का?
गडे! आनन्दामधि असा आपुला काळ कधि जाइल का?

म्हणुनि असे जो बहर तोवरी
टिप फुले टिप!
पहा फुलांची पखरण झिप!
माझे गडे ग!
टिप फुले टिप!

## पुष्पाप्रत

पुष्पा! सुंदर किति तू दिससी!
सौकुमार्य माधुर्यहि धरिसी!
तुजला बघता मन माझे तू - वेडे रे करिसी!

तू आणिक मी पूर्वी होतो
खेळगडी रे! स्मरूनि अहा तो
काळ सुखाचा आता चित्ता - खेद फार होतो!

मुग्ध मधुरता चित्ती घेता
पूर्वी अपुली होती समता,
गेला गेला काळ अहह तो! फेर किती आता!

सौकुमार्य तव अजुनी आहे,
हसतचि आहे हास्य तुझे हे;
वरि मम भाळी ढग अश्रूंचा - हाय! डवरलाहे.

तुजला पाहुनि मी नाचावे,
दुडदुड धावत तुजसी यावे,
प्रेमे तुजला स्वकरी घेउनि - सखया! चुंबावे.

आताहि गमे घ्यावे तुजला,
परी सुटतसे कंप कराला!
दिव्यत्वाला स्पर्श कराया - भय वाटे मजला!

रम्य धुक्याची अदभुत सृष्टी.
तीत उघडिसी अपुली दृष्टी!
मग तो भास्वान तुजवरि करितो - तेजाची वृष्टी!

मरूदगण तुझ्या पाळणियाला
तत्पर आंदोलन द्यायला;
पक्षिमुखांही स्वर्ग तुझ्यावरि - गाई गीतांला!

रम्य तुझे बा जिणे कितितरी,
परिमलयश तव जाय भूवरी;
काळहि तुझिया दिव्यत्वाला - वाटे नमन करी!

चिरतरूणा रे! चिररूचिरा रे!
तुजसन्निध तो वास बरा रे!
तुजमजमध्ये परी केवढी - आहे रूंद दरी रे!

काळोखाच्या जगामध्ये या
मृत आशांच्या चितांवरूनिया
पिशाच माझे भटकत आहे - शांति नसेचि तया!

मच्चित्ताच्या क्षितिजावरती
नृत्याला जी स्वप्ने करिती
निदान त्यांच्यामध्ये मजला - भासी तव मूर्ती!

सौभाग्य पुष्पा! तव गावयाला
मी पात्र नाही गमते मनाला;
भुंगे तुझे स्तोत्र सुरेख़ गाती
ऐकूनि ते सर्व पळोत खंती!

## फुलपाखरू

बाळ्या:- “ताई! मला ते धरून दे ग फुलपाखरू!
गडे खेळायला,
बागडायला,
हवे मला;
“तर, धरून मला दे लौकर ते फुलपाखरू!
दे ग दे ग ते फुलपाखरू!” १

ताई:- “बाळ्या! जाउ दे ते नको अम्हा फुलपाखरू!
उडू दे रे,
नाचू दे रे,
फुलांवरी रे,
ते इकडे तिकडे गरिब बिचारे पाखरू!
पण नको अम्हा ते पाखरू!” २

बाळ्या:- “असे का बरे म्हणतेस ग माझे ताई!
ते सुरेख किती!
ते खुले किती,
त्याची मजा किती,
तर, गोजिरवाणे धरून दे ग, कर घाई!
मला ‘नाही’ म्हणू नको काही!” ३

ताई:- “ते सुरेख आहे, म्हणून बाळ्या! सांगते
ते धरू नये,
त्याला अडवू नये,
त्या दुखवू नये,
तर सांगु नको ते धरायला, हेच मागते;
पहा! फुलांवरि बागडते!” ४

बाळ्या:- “ते सुरेख आहे, म्हणुनच तर मी मागतो;

त्याला काही
माझे ताई!
दुखवित नाही;
मला खेळायला ते धरून दे, हे सांगतो
गडे! तुझी विनवणी करितो!” ५

ताई:- “गडे! असा नको तू धरू हट्ट रे बाळा!
ते लहान आहे,
फार नाजुक आहे,
कोमल आहे;
त्याला खपणार नाही आपल्या खेळाचा चाळा!
त्याचा होईल चोळामोळा! ६

माझा शाहाणा ना तू! कडेवर तुला घेते!
माझ्या लाडक्या रे!
माझ्या छकुल्या रे!
मजा पाह्यला रे,
त्या पाखरामागून वेलींमधून तुला नेते!
मग झाले ना? –
सोग्या! पहा कसे ते फुलांवरी बागडते!
झणि हवेमधीही तरते!” ७

## चिन्हीकरण

भूचक्राची घरघर जिथे ती न ये आयकाया,
आहे ध्यानाभिध रूचिर तो कुंज त्या शांत ठाया ;
त्याचे द्वारी उपवर वधू मूर्तिनाम्नी विराजे,
तीचे संगे वर परम तो भावशर्माहि साजे.

होती पर्युत्सुक बहुत ती शीघ्र पाणिग्रहाला,
तेथे आत्मा भ्रमत कविचा तो उपाध्याय आला;
स्फूर्तिज्वालेवरि मग तये होमुनी जीविताला
लग्नाला त्या शुभकर अशा लाविता तो जहाला.

गेले कुंजी त्वरित मग जे जोडपे दैवशाली
केली त्यांही बहुविध सुखे त्या स्थली प्रेमकेली;
झाली त्यांना बहुत मधुरे बालके दिव्य फार,
ती जाणा ही - सुरस कविच्या क्लृप्ति तैसे विचार!

## प्रतिभा

ती अत्यदभुत गूढ शक्ति सहसा संचारता अंतरी
मुक्तात्मा गगनी उडे, बिथरतो इंद्राश्व ते पाहुनी;
दैत्यांचे बल, देवसत्वहि तसे अंगी चढे त्या क्षणी;
सायुज्यत्व विराट पूरूष अहा! देतो स्वये लौकरी.

स्वान्ती मण्डल जे हिरण्मय तधी दिव्य प्रभा विस्तरी,
त्याच्या पाजाळिती अरांवरि सुखे देव स्वशस्त्रे जुनी;
येती दानव मोहुनी दुरूनि जे त्याचेकडे धावुनी,
ते नाशाप्रत पावती झडकरी तेथे पतंगापरी!

पिण्डी जाय विलोपुनी विरूनिया ब्रह्मांड हे सत्वर
शब्दब्रह्म उचंबळून मग जे दाही दिशा व्यापिते,

त्याच्यातून भविष्यवाद निघती; ऐकूनि ते सादर
ब्रह्मयाते क्षमता नवीन - रचना - कार्यक्रमी लाभते.

देवांची जननी प्रसन्न जर का ही शक्ति कोणावर,
नाही यात विशेष, तुच्छ जग हे त्यालागुनी वाटते!

## कवि

मज्जेची निज जो फुले पसरितो आयुष्यमार्गावरी,
आहे अदभुतरम्य का अधिक ते त्याहून काही तरी?
चाले तो धरणीवरी तर पाहा! जेथून तो चालिला,
धूली तेथिल होतसे कनकिता; घेऊ नका भ्रांतिला.

तो गंभीर वदे रवा, तर मुक्या पृथ्वीस या वाटते,
की, "माते श्रुति लक्षसंख्य फुटल्या," आणीकती ऐकते!
दृष्टी तो फिरवी वरी, तर लवे आकाश ते खालती
तारांचे गण गावयास वरूनी स्तोत्रे अहा! लागती.

लीलेने स्वकरात तो धरितसे कांडी बरूची जधी,
साऱ्या सुन्दर वस्तु त्या झडकरी येती समाधीमधी
त्याच्या, येउनि त्या तयास वदती "आम्हांस दे भूषणे -
दिव्ये आणि शिकीव लौकरि अम्हा ती अप्सरोगायने!"

श्वासोच्छवास करी परी नवल हे:- जीवित्वसंहारक
वायू घेउनि आत तो त्याजितसे वायूस त्या पोषक!
राही तो, तर देव भूमिवरती येतात हिंडावया,
जाता, स्वर्ग सवे धरेस उतरे त्यालागि धुंडावया!

# फिर्याद

जिने मला वेडा केले तिच्यावरी ही फिर्याद ध्रु

ऋतु वसन्त येउनि कुसुमी उपवनास शोभा आली;
कुंजी मी बसलो एका, हर्षित मग वृत्ती झाली;
आली तो कोणी युवती त्या स्थळी रूपगुणखाणी
चुंबुनि मज गुणगुणली ती मधुर गीत माझे कानी!

तल्लीन सवे मी झालो,
विकलगात्र होउनि गेलो,
निर्वाणी पूर्ण बुडालो -
नुरलीच जगाची याद!

जिने मला वेडा केले तिच्यावरी ही फिर्याद १

अंतर्हित झाली रामा भानावरि येता कळले;
विरही मी पीडित झालो हृदयी उत्कंठा - अनले;
ध्यास तिचा घेउनि फिरलो शून्य दिशा रानोमाळ,
तिचेवरी गाणी वेडी गाइली क्रमाया काळ!

"पुरता न अनुग्रह करिता
गेलीस कशी सुखसरिता?
धाव, करी न दयाब्धि रिता!"
ही तिला घातली साद!

जिने मला वेडा केले तिच्यावरी ही फिर्याद २

स्वप्नातचि केव्हा भेटे नेते तो स्वर्गद्वारी,
लोटिते मागुती खाली भूतलावरी अंधारी!
तेणे मी विव्हल भारी संसारी परि करमेना,

धन न करी, वणवण करितो, जम कोठे नीट जमेना!

तरि तिलाच चित्त ध्याते,
निद्रेविण रजनी जाते!
आप्तवर्ग म्हणती “याते -
कुठली ही जडली ब्याद!”

जिने मला वेडा केले      तिच्यावरी ही फिर्याद      ३

हीन दीन झालो छंदी      फंदी मी तुझिया नादी,
त्यामुळे परी न मनाला      घालितो कधीहि विषादी;
बूज तुवा या दासाची      केली गे नाही अजुनी,
दुःख हेचि वाटे म्हणुनी      गातसे अशी गाऱ्हाणी!

तूच चित्त आधी हरिले,
मज आता का दुरि धरिले?
चिर चरण तुझे मी स्मरले!
ही प्रसन्न, नुरवी खेद!

जिने मला वेडा केले      तिच्यावरी ही फिर्याद      ४

## रूष्ट सुंदरीस

नादी लावुनि येडा केले ज्वाला तू सुंदरी!
रूष्ट कशी होऊन बैसशी आता त्याच्यावरी? धृ

सकल दैवते तुच्छ करूनि मी तव भजनी लागलो,
व्यर्थ का आजवरी भागलो?
तुझ्या कृपेचा प्रसाद व्हावा म्हणुनी झटलो किती;
असे का त्याला काही मिती?
कधी मला तू उत्तेजनही दिले
स्मरत नसे का स्मित मजला दाविले?
अर्थपूर्ण वीक्षणेहि केव्हा श्रम मम केले दुरी;
लहर का आता फिरली परी? १

कितीक माल्ये श्रमसाकल्ये गुंफुनिया ती भली
तुला गे संतत मी वाहिली!
आमरणेही असाधारणे दिधली तुजकारणे
फिटाया दासाचे - पारणे!
परि दुभंग मम कसे उभे राहिले?
काय तयाने न्यून बरे पाहिले?
तेणेकरूनी रोष असा तव उदभवला अंतरी,
मम मना चिंतावश जो करी! २

हाय! हाय! हे विफल जिणे तव सहवासावाचुनी
निघु की निवट्ट मनुजांतुनी?
प्रीतिविषय तो जर का परका प्राण्याला जाहला;
तयाचा जन्महेतु खुंटला!
विषण्ण तो मग विषवृक्षाची फळे
सुधारसाची मानुनि गिळिलचि बळे!
दोष तयाचा काय त्यामधे? वद मधुरे सत्वरी!
करू ना मीहि अता त्यापरी? ३

तुजवरि पद्ये हे अनवद्ये? कितीतरी गाइली;
भक्तिविण कोणी ती प्रेरिली?
तुजला वाहुनि असे घेतले, म्हणुनि निदानी असे
निखालस तुजला पुसतसे -
निष्ठा माझी काय लाविसी कसा?
की मज पिळिसी रूचि चढवाया रसा?
किंवा तुझिया कृपेस नाही पात्रच मी लवभरी?
सोक्ष की मोक्ष बोल लौकरी! ४

## थकलेल्या भटकणाराचे गाणे

किती रहावे तुजविण आता? धीर न मजला क्षण धरवे
गेले गेले वय हे वाया! मरणहि ते वाटे बरवे!
काय करावे मज न सुचे,
मुळी न मजला किमपि रूचे,
हृदयी सगळे धैर्य खचे;
भणभण वणवण करित अधिक मज आढयीहि जगी नच फिरवे!
किती रहावे तुजविण आता? धीर न मजला क्षण धरवे! १

कितिक योजिले यन्त यावया तुजशी मी उत्सुकतेने!
व्यर्थ जाहले अवघे! दुर्धर कसे न व्हावे मग जगणे!
पुष्पांनो! तर दूर सरा!
कंटक हो! मार्गी पसरा!
प्रकाश नलगे, तिमिर बरा!
सर्व चांगले व्हावे होते तुजसाठी - पण लभ्य नव्हे!
किती रहावे तुजविण आता! धीर न मजला क्षण धरवे! २

शूळ कपाळी, कंडन हृदयी, कंप शरीरी भरलासे,
सलिल लोचनी, शीण अवयवी; हाय! निराशा मनी वसे;
तरि माझी ती भेटेल का?

पांग मनीचा फिटेल का?
आलिंगू ती झटेल का?
क्षमा करिल का मजला चुक्यांची? पुसतो मी माझे बरवे!
किती रहावे तुजविण आता! धीर न मजला क्षण धरवे! ३

## जरी तू ह्या येथे

जरी तू ह्या येथे असतिस सखे सौख्यद मला,
तुझ्या तेथे वा मी जरिहि असतो लोलूप तुला,
तरी खासे झाले कितिक मजला सांग असते?
दुरावू; अन्योन्या कवळुनि, दिले आम्हि नसते. १

त्वरेने त्या क्रीडा मग उजळित्या या रजनिते,
- सरेना जी खेपा करित असता मी इथतिथे,
- तुला वा मच्चित्रे क्षण दिसवुनि लाजवुनिया,
पुन्हा ती झाकोनी, छळ तव करी जी समयि या. २

'प्रिये', 'कांते', ही मी मधुर अभिधाने मग किती
श्रुतिद्वारे चित्ती तव दवडिली जाण असती!
न वा ऐसे - ती मी लिहुनि निजदन्ती त्वदधरी,
तुवा ती वाचाया मुकुर धरितो मी तव करी! ३

'प्रिये', 'कांते', ऐशा मधुर अभिधानांस अधुना
लिहावे मी पत्रावर लकडिने या अहह! ना?
परी तीही आता अतितर सुटोनी थरथर!
पुरी हाताच्याने नच करवती गे हरहर! ४

पुरी हाताच्याने नच करवती ती प्रिय जरी,
न वा डोळ्यांच्यानी क्षण बघवती तेवि अपुरी,
पुसाया ती इच्छी, परि कर धजेना म्हणुनिया
कराया सांगे ते स्वनयनजलाला रडुनिया! ५

## प्रीती

प्रीति मिळेल का हो बाजारी?
प्रीति मिळेल का हो शेजारी?
प्रीति मिळेल का हो बागांत?
प्रीति मिळेल का हो शेतात?
प्रीतिची नसे अशि ग मात; पहा शोधुनी हृदयात!

नंदनवनामधी आला
कल्पलतेला बहर भला;
तिची हृदयि बीजे पडली
प्रीति त्यातुनी अवतरली;
प्रीतिची असे अशि ग मात; पहा आपुल्या हृदयात!

प्रेमळ कृत्यांची माळ
प्रियजनकंठी तू घाल;
द्विगुणित मग तो प्रीति तुला
देइल न धरी शंकेला.
प्रीतिचा असा असे ग सौदा, प्रीतिने प्रीति संपादा!

हृदयी आलिंगन पहिले,
चुम्बन मुखकमली वहिले.
अणिक रूचतिल ते चार
प्रीतिला होती उपचार.
प्रीति वाढली गडे ग! सतत
पहा तू प्रियजन - हृदयात.
प्रीति असेल का ग बाजारी? वेडे, प्रीति मिळेल का ग शेजारी?

## प्रयाण - गीत

तुजविण मजला काहि असेना प्रिय या गे जगती,
तू मम जीवित, तू मम आत्मा, तू माझी शक्ती!
तुजला सोडुनि जाणे येई सखे! जिवावरती,
परी ओढुनी दूर नेति या निर्दय दैवगती!

प्रीति जगाचे वसन विणितसे, वामांगी ढकली
धागा; परि तो परतुनि उजविस भेटतसे कुशली!
मेघ विजेला नभी सोडुनी खाली ये, परि तो
रविदीप्तीच्या दिब्यरथी तिज भेटाया वळतो!

रवी, पूर्वेला रडत सोडुनी, कष्टे मार्ग धरी;
प्रहरामागे प्रहर लोटता तिजला घे स्वकरी!
धरेस सोडुनि गिरी जरि वरि जे उंच नभी चढले,
तरी खालते कालगतीने येती प्रेमकले!

प्रीतीचा पथ वर्तुळ आहे, नर त्याने जाता
मागे असल्या प्रियेचिया तो सहजचि ये हाता!
धीर धरोनी आटप म्हणुनी, बाष्पे मजसाठी;
ठसा प्रीतिचा ठेवु शेवटी ये ग गडे! स्वोष्ठी.

## माझा अन्त

मी पाहिली एक सुरम्य बाला;
वर्णू कसा त्या स्मरसंपदेला?
वृक्षावरी वीज जधी पडावी,
त्याच्या स्थितीतचि तिची महती पहावी.

माझी अवस्था बघुनीच तीचे
सौदर्य सोपे अजमावयाचे;
वस्ताद जी चीज जगी असावी,

तीचे स्वरूप सगळे परिणाम दावी.

सौदर्य पुष्पासम वर्णितात,
झाले मला कंटकसे प्रतीत;
सौदर्य मानोत सुधानिधान,
ते जाहले मज परंतु विषासमान!

नेत्रे क्षणी तारवटून गेली,
अंगे ज्वरी त्या परतंत्र झाली,
झालो तिला मी बघता भ्रमिष्ट,
शुध्दी सवेचि मग होय अहा! विनष्ट.

माझा असा अन्त अहो! जहाला.
‘कोठूनिया हा मग येथ आला?’
ऐसा तुम्हां संशय येतसे का?
मी भूत हे मम असे, नच यात शंका!

## फार दिवसांनी भेट

बहुता दिवशी भेट जाहली,
प्रणय - सिंधुला भरती आली! ध्रु

आलिंगन दृढ देता आला
उभयी हृदयी त्वरित उमाळा;
नावरून ती रमणीनयनी
बाष्पे आली ऊन होउनी;
गलित शीर्ष निज पतिच्या हृदयी
ठेवुनि रडली ती त्या समयी;
तोहि उसासे टाकित; तिजला
चुंबित गाळू टिपे लागला;
उभयाश्रुजले मिसळुनि गेली!
बहुता दिवशी भेट जहाली. १

वियोगसमयी झाले त्यांचे
म्लान रूप ते परस्परांचे
ध्यानी येता प्रेमग्रंथि
त्यांची झाली अधिकचि दृढ ती;
काले आणिक कष्टदशेने
क्षीणत्वाला होते जाणे
सगळ्यांचेही, परी प्रीतिचा
जोम वाढतो उलटा साचा.
कुरवाळित अन्योन्या ठेली,
व ता दिवशी भेट जहाली. २

किती वेळपर्यत तयांना
काही केल्याही वदवेना;
'प्रिये लाडके!' 'जिवलग नाथा!'
हे रव वदली मग उत्सुकता;
फुटकळ वाक्ये मग दोघांही
परस्परां जी म्हटली काही,
भाव त्यातला की - नच व्हावा!
वियोग फिरूनी, किंवा यावा
मृत्युच दोघा त्याच सुवेळी
जधी बहु दिनी भेट जहाली! ३

## दिव्य ठिणगी

या लोकी बघुनी कभिन्न सगळा अंधार कोंदाटला,
सारावा दुरि तो जरा तरि असा हेतू मने घेतला;
स्फूर्तीचे अवलंबुनी म्हणुनिया मी यान ते उध्दर
तेजाच्या उगमाकडेच सहसा ते चाललो सत्वर.

एका सुंदर वेदिकेजवळ मी जाऊनिया पोचलो,
ज्वाला दिव्य चिरंतनी बघुनि त्या वेदीवरी, थांबलो;
ती ज्वाला नव्हती निजद्युतिमधी छाया मुळी पाडित,
त्या ज्वालेपुढती तपश्चरण ते मी वाकलो साधित.

ज्वालेने रमणीय एक ठिणगी माझ्याकडे धाडिली,
ती मी आपुलिया उदात्त हृदयी सानन्द हो स्थापिली;
पृथ्वीने मज आणण्यास वरती होते जिला धाडिले,
प्रीतीने मग त्या फिरूनि मज या लोकामधी आणिले.

खाली येउनि पोचता, बलि दिला ज्वालेस त्या मी किती
ते माते कळले पुरे, परि तुम्हां त्याची कशाला मिती?
ज्याला मी मुकलो विषाद मजला त्याचा मुळीही नसे;
जे पृथ्वीवर आणिले जन तया धिक्कारिती हा! कसे!

## सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि

तारा निष्प्रभ जाहल्या निजपथी, प्राची दिशा रंगली
गावाला खग लागले, मधुर निःश्वासू फुले लागली;
प्रावावरून उषा तुषारपटला सूर्यप्रतीक्षा करी,
होतो पाहत डोंगरीवरि उभा मोह्ूनि मी अंतरी.

‘पश्यात्रास्मि’ म्हणोनि एक घुमला गंभीर तेथे ध्वनि,
‘भो! कुत्रासि?’ विचारले निजमुखे तेव्हा तयालागुनी;
‘कुत्राप्यस्मिच? सर्व वस्तुषु’ असे ये तेधवा उत्तर;

ते ऐकूनि जरा करीत मनना मी ठाकलो नंतर.

धोंडा एक समीप हो पडुनिया होता तिथे, त्यावरी
गेली दृष्टि मदीय, कौतुक तधी झाले मनाभीतरी;
का की त्या ध्वनिचे खरेपण मला धोंडयात त्या भासले;
काढू बाहिर ते झट्नि, मग हे चित्तात मी घेतले.

टाकीचे, म्हणुनी तयावरि जधी आघात मी बोपिले,
तो - सांगू म्हणुनी किती मज मनी आश्चर्य जे जाहले!
मूर्ती दिव्य अशी अहा! उतरली धोंडयामधूनी भली!
माझी दृष्टि असे अलौकिक, मला जाणीव ही जाहली.

## क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास

आत्माराम सुखे वनामधुनि तो होता जग हिंडत,
तो झाला बघता दुरूनि सहसा कोण्या सुमूर्तीप्रत;
तीच्यामागुनि मोहुनी हळुहळु जायास तो लागला,
“आहे ही पण कोण?” या क्षणभरी प्रश्नावरी थांबला.

“रम्भे! उर्वशि गे!” तशीच दुसरी जी त्यात होती प्रिये
नामे, त्यांतिल घेउनी फिरूनि तो बाही त्वरेने तिये;
ती काही तरिही वळे न, बघुनी तो विस्मया पावला
जाता सन्निध “ही नवीनचि अहा! कोणी दिसे” बोलला.

काही नाव नवीन देउनि तिला जेव्हा तये बाहिले.
तो तीने वळुनी प्रसन्न वदने त्याच्याकडे पाहिले;
त्या रूपद्युतिने दिपूनि नयने निर्वाण तो पावला,
तो अंतर्हित दृष्टिचा विषय तो एका क्षणी जाहला!

आकाची इतुक्यात हाक परिसे आत्मा, घराला वळे;
आकाच्या हुकुमात, साक्ष अवघी ती विस्मरूनी, रूळे;
कोणेका दिवशी तिथेच फिरता ती गोष्ट त्याला स्मरे,

तच्चित्ती पण रूप नाम अथवा तीचे मुळीही नुरे!

आत्माराम सखेद होउनि वदे तो आपणाशी असे -
“काही सुंदर देखिले खचित मी, यामाजि शंका नसे.
हा! हा! हे जर सर्व भास धरिता येतील माते, तर
पृथ्वीचा सुरलोक की बनवुनी टाकीन मी सत्वर!”

## प्रणय - कथन

म्हण मला आपला ‘प्रिय जिवलग’ हे मधुरे!
वद असे मजवरी प्रेम तुझे ग तारे! जिवलगे! ध्रु.

जे वाटे ते वदण्याहूनि तदनुरूप बरवे करणे,
सुज्ञ सांगती व्यवहारी हा नियम निज मनी धरणे;
शहाणपण हे लौकिक सखये गुंडाळुनि तू ठेवी.
क्षणभर त्याच्या विरूध्द मजला निजवर्तन तू दावी.
म्हण मला० १

हार तुरे हे मजकरिता तू असती सुंदर केले;
अगरूची ही उटी सुवासिक सिध्द असे या वेळे;
यावरूनि जरी शंका न उरे मला तुझ्या प्रणयाची
तरीहि वेडयापरि मी तुजला तसे वदाया त्याची!
म्हण मला० २

व्यवहाराची काय कसोटी प्रीतीला लावावी?
प्रीतीपुढती सुज्ञपणाची काय थोरवी गावी?
विसर विसर तू व्यवहाराला, विसरहि सुज्ञपणाला,
आणिक वेडी होउनि वद जे व्हावे या वेडयाला!
म्हण मला० ३

जलाशयाला झरी मिळाया असता जात तयाला

निज मंजुरवे न काय वितरी ती अपुल्या प्रणयाला?
नदी निधीला भेटायाला जाता ती वेगाने
काय बरे स्वप्रिया कथाया गावे खळखळ गाणे?
म्हण मला० ४

सागर - लहरी किनाऱ्यास घे वळघे आलिंगाय,
किति निःसीम प्रेमघोष ते करिते वद समयी त्या?
हवा गिरीशी रमावयाला त्वरित गतीने धावे
प्रणय - कथन ते तीचे तुझिया श्रवणा काय न ठावे?
म्हण मला० ५

सांगितल्या या प्रणयवतींचे वळण तुवाही घ्यावे,
मौन असे हे काय म्हणुनि तू वद गे स्वीकारावे?
ताम्बूल असो; मधुपर्क असो, असो पुष्पशय्याही,
येइल तुझिया आशयास का पुरी व्यक्तता याही?
म्हण मला० ६

जड हस्तांच्या मर्यादित या कृतींमध्ये पर्याप्ति
जडातीत त्या मनोगताची कशी बरे व्हावी ती?
शुक्तिपुटी जर समाविष्ट तो रत्नाकर होईल,
उपचारी निस्सीम प्रीतिहि पुरती समजावेल!
म्हण मला० ७

स्वाभिप्राया विदित कराया एकच साधन मोठे,
जिव्हाग्री ते; पाहा विचारूनि मनी खरे की खोटे?
दो हृदयांच्या संगमसमयी कसल्या लौकिक रीती
घेउनि बससी, सोड लाडके मर्यादेची स्फीती!
विसर तर क्षणी व्यवहाराला, विसर शहाणपणाला,
आणिक वेडी होउनि वद जे व्हावे या वेडयाला!
म्हण मला आपला ‘प्रिय - जिवलग’ हे मधुरे!
वद असे मजवरी प्रेम तुझे गे तारे! जिवलगे! ८

## मनोहारिणी

तीच मनोहारिणी; जी ठसलिसे मन्मनी! ध्रु

सृष्टिलतेची कलिका फुलली,
अनुपम माधुर्याने भरली,
जिच्या दर्शनी तटस्थ वृत्ती
भाव सर्वही विसरूनि जाती;
ती युवती पदमिनी जी ठसलीसे मन्मनी! १

निज गौरवे शशिकांतीला
लज्जा आणीलच ती बाला;
तल्लावण्यप्रभा चमकते!
विजेहूनिही नेत्र दिपविते!
रूपाची ती खनी जी ठसलीसे मन्मनी! २

"इच्या कुन्तलावरणाखाली
तारका कुणी काय पहुडली!
उज्ज्वलता ही तरीच विलसे
भाळी!" हा उदगार निघतसे,
ती तरूणी पाहुनी जी ठसलीसे मन्मनी! ३

"शीर्षी निजल्या त्या तारेचे
किरण आगळे या रमणीचे
नेत्रांवाटे काय फाकती!"
उदगारविते प्रेक्षकास ती
निज दृष्टिप्रेषणी जी ठसलीसे मन्मनी! ४

गुलाब गाली अहा! विकसले,
आणि तेथ जे खुलुनि राहिले,
विलक्षणचि ते - कंटक त्यांचे

सलती हृदयी कामिजनांचे
ऐशी ती कामिनी जी ठसलीसे मन्मनी! ५

मृदु हसता, ती मधुर बोलता
प्रगट होय जी हृदयंगमता,
तीच्या ग्रहणा नयने श्रवणे
सुरांचीही वळतील लुब्धपणे
ऐशी ती भामिनी जी ठसलीसे मन्मनी! ६

वक्षःस्थल पीनत्व पावले,
गुरूत्वहि नितंबी ते आले,
तेणे सिंहकटित्व तियेचे
अधिकचि चित्ताकर्षक साचे!
विकल करी मोहिनी जी ठसलीसे मन्मनी! ७

बहराला नवयौवन आले,
ओथंबुनि ते देही गेले!
म्हणुनि पळाली बाल्यचपलता,
गतिने धरिली रूचिर मंदता
गजगमने शोभिनी जी ठसलीसे मन्मनी! ८

सौदर्ये शालीन्ये पुतळी
ती रामायणमूर्तीच गमली,
उदात्त मुद्रा, गंभीर चर्या,
याही भारत खचिता वर्या
ती रमणी सदगुणी जी ठसलीसे मन्ममी! ९

तिच्या दर्शने मन उल्हासे,
तिजविण सगळे शून्यचि भासे,
म्हणुनि करूनी ध्यानधारणा
अन्तर्यामी बघतो ललना
तीच मनोहारिणी जी ठसलीसे मन्मनी! १०

## कवितेचे प्रयोजन

‘शान्तीचे घर सोडुनी प्रखर त्या हाटी प्रयत्नाचिया,
प्रीतीचाही निकुंज सोडु नि रणी जीवित्व नावाचिया,
सर्वांही सरसावणे झटुनिया हे प्राप्त झाले असे;
या वेळे न कळे कवे! तुज सुचे गाणे अहा रे कसे?

माता ही सुजला स्वभूमि सुफला, तीच्या परी लेकरा
खायाला पुरते पहा नच मिळे की हाल आहे पुरा;
झाकायास तनूस वस्त्रहि न ते आता पुरेसे मिळे
या वेळेस कसे कवे! तुच सुचे गाणे न माते कळे!’

हे कोणी म्हणता जवे कविमनी खेदोर्मि हेलावल्या,
नेत्रांतून सवेचि बाष्पसरिता वाहावया लागल्या
त्याचा स्त्रैणपणा असा प्रकटला वाटेल कोणा, परी
धीरोदात्त असेचि तो श्रुत असे हे दूरही भूवरी!

सोन्याचे सरले अहा! दिवस ते, आली निशा ही कशी!
सौख्याचा नद तो सुकून पडला या दुःखपंकी फशी
कालक्रीडित हे बघून रडला हे व्यस्त काही नसे;
प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवींचा असे.

बाष्पांती तरल स्वरे मग कवी निःश्वासुनी बोलला -
‘जो पूर्वी गुण पुण्यभूमिवरि या अत्यन्त वाखणिला,
ते हे दिव्य कवित्व दुर्विधिवशे हीनत्व की पावले,
त्यांची बूज करावया न अगदी कोणी कसे राहिले!

गाणे जे परिसावया कविपुढे राजेशही वाकले,
यन्नादेच लहानथोर सगळे गुंगून वेडावले,
त्याला मान नसे, नसो; पण ‘अता त्याची अपेक्षा नसे’
हे कोणी म्हणता विषाद अहिसा मन्मानसाला डसे!

आलेल्या दूरवस्थितीतुनि तुम्ही उत्तीर्ण व्हाया जरी,
उद्योगी रत व्हावयास धरिता औत्सुक्य चित्ती, तरी
गाण्याने कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल,
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल!

हाती घेउनिया निशाण कवि तो पाचारितो बांधवा
'या हो या! झगडावयास सरसे व्हा, मेळवा वाहवा!'
प्रेतेही उठतील जी निजरवे, ती तो तुतारी करी
आता नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी!

आशा, प्रेम तसेच वीर्य कवनी तो अपुल्या गाइल;
गेले वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल;
द्या उत्तेजन हो कवीस, न करा गाणे तयाचे मुके;
गाण्याने श्रम वाटतात हलके, हेही नसे थोडके;

आता जात असे दुरी शिथिलता अस्मतसमाजातुनी
याची खूणच गान जे निघतसे ते साच जाणा मनी;
तारा ताणिलियावरी पिळुनिया खुंट्यांस वाद्याचिया.
त्यांच्यातून अहा! ध्वनी उमटती, जे गोड ऐकावया!

## काव्य कोणाचे?

"कवे! कोणी हे काव्य लिहीयेले?"
"मीच" कविने प्रतिवचन बोलिजेले;
"बरे तर! हे वाचून अता पाहू,
श्लोक सुन्दर यातील सदा गाऊ." १

मनी वाचक तो दंग फार झाला,
क्लृप्ति आढळली सरस एक त्याला;
म्हणे कविला "ही रम्य फार आहे"
वदे कवि, "ती मम क्लृप्ति परी नोहे." २

पुढे हृदयंगम पंक्ति एक आली,
वाचकाची तल्लीन वृत्ति झाली;
कवीला तो “शाबास!” म्हणे, त्याते
कवी बोले, “मम पंक्ति की नव्हे ते.” ३

पुढे वर्णन पाहून रेखलेले,
वाचकाचे रममाण चित्त झाले;
कविस शंसी तो “धन्य!” अशा बोले,
त्यास “वर्णन मम न ते” कवी बोले. ४

“काव्य लिहिले तू सत्य हे असून
‘नव्हे माझे हे, नव्हे ते,’ म्हणून
सांगसी, तर परकीय कल्पनांते
तुवा घेउनि योजिले, गमे माते” ५

“नव्हे ऐसेही? कवी वदे त्याते
काव्य लिहिले मी खरे, परी माते
शारदेने जो मंत्र दिला कानी,
तसे लिहिले मी; काव्य तिचे मानी ६

दिव्य शक्तीने स्फुरे गंध पुष्पी,
रंग खुलतीही तिने इंद्रचापी,
सृष्टिमाजी जे रम्य असे काही
तीच कारण त्या शक्ति असे पाही.” ७

## नैॠत्येकडील वारा

जे जे वात नभात या विचरती पुण्यप्रदेशावरी
नैॠत्येकडला तयात वितरी सौख्यास या अंतरी;
येता तो मम चित्त हे विसरूनी प्रत्यक्ष वस्तूंप्रति
अर्धोन्मीलित लोचनी अनुभवी स्वप्नस्थिती मागुती!

तो वारा मम जन्मभूमिवरूनी येतो जवे वाहत,
हे माझ्या हृदयात येउनि सवे मी ठाकलो चिंतित;
माझ्या जन्मधरेचिया मग मनी रूपास मी आणितो,
तीचे डोंगर उंच, खोलहि नद्या डोळ्यापुढे पाहतो.

मोठे, उच्च, शिला किती पसरल्या सर्वत्र ज्यांच्यावरी
तुंगे ती शिरली यदीय शिखरे तैशी नभाभीतरी.
आस्वर्गात चढती सदोदित महात्म्यांची जशी मानसे
या दृष्टीपुढते पुन: बघतसे अद्रीश ते हो असे!

ज्यांच्या रम्य तटांवरी पसरल्या झाड्या किती सुंदर,
ज्यांच्या थोर शिलांतुनी धबधबा जाती तसे निर्झर,
वाणीचे कविदुर्दशांमधुनिया ते ओघ यावे जसे,
या दृष्टीपुढते पुनः बघतसे अद्रीश ते हो असे!

त्यांच्या उंच शिरांवरी विलसती किल्ले मराठी जुने,
देवी पालक त्यांतल्या मज पुनः धिक्कारिती भाषणे!
“कोठे पूर्वज वीर धीर तव? तू कोणीकडे पामरा?
ये येथे इतिहासपत्र पडके वाचूनि पाही जरा!”

जागोजाग विराजती चलचले पाटस्थले ती किती,
केळी, नारळि, पोफळी, फणस ते आंबे तिथे शोभती,
पक्षी त्यांवरूनी नितान्त करिती ते आपुले कूजित
स्वप्नी हे बघता फिरूनी, मन हे होते समुत्कण्ठित.

जागोजागहि दाटल्या निबिड की त्या राहट्या रानटी,
ते पाईरहि, खैर, किंजळ, तिथे आईनहि वाढती,
वेली थोर इतस्ततः पसरूनी जातात गुंतून रे!
चेष्टा त्यांमधुनी यथेष्ट करिती नानापरी वानरे!

जन्मस्थान मदीय सुंदर असे, त्या माल्यकूटातल्या
आनन्दे वनदेवता मधुर जी गाने भली गाईल्या
मज्जन्मावसरास ती, पवन हा वेगे महा तेथुनी
माते पोचवितो, तया अणुलिया पंखांवरी वाहुनी!

'गाऊ या, हृदयात या अमुचिया प्रीती असे दाटली!
गाऊ या, हृदयात या अमुचिया का स्फूर्ति ही वाढली?
वाग्देवीसुत जन्मला अपुलिया ग्रामात; यालागुनी
जैजैकार करा; सुरा परिसवा हा मंगलाचा ध्वनि!'

वेगाने जगदुध्दरा निदिचिया तीराहुनी वात तो
आशीर्वाद मदीय तात - जननी यांचे मला आणितो;
वात्सल्यास तथाचिया परिसुनी माझ्या मनी येतसे -
'तान्हा बाळचि राहतो तर किती ते गोड होते; असे!'

आईच्या नयनांत नित्य मग ती स्वर्गांस त्या पाहतो
तातांकावरि नित्य मी मग जगद्राज्यासना भावितो;
का हो यापरि वाढलो फुकट मी? हा - हंत; मी हा नष्ट हा!
तान्हा बाळचि राहतो तर किती ते गोड होते अहा!

जन्मा येउनि मी उगा शिणविले आई! तुला हाय गे!
ताता : भागविले तुला फुकट मी मत्पोषणी हाय रे!
वार्ध्दक्यी सुख राहिले; विसरणे तुम्हांस कोणीकडे!
झालो कष्टद मात्र या मम शिरी का वीज ती ना पडे?

पुष्पे वेचित आणि गोड सुफले चाखीत बागांतुनी
जेथे हिंडत शैशवी विहरलो निश्चिंत मी, तेथुनी

हा वारा ममताप्रसाद मजला आजोळाचा आणितो;
चित्ती विव्हळ होतसे स्मरूनि, मी मातामहा वंदितो!

बन्धूचीहि मला तशी पवन हा आशीर्वचे आणितो,
चिंताग्रस्त तदीय पाहुनि मुखा अश्रूंस मी गाळितो!
भाऊ रे! तुजलागि लाविन कधी मी हातभारा निज?
तूते सेवुनि मी सुखे मग कधी घेईन का रे निज?

श्वासांती लिहिली, विराम दिसती ज्यामाजि बाष्पीय ते
प्रीतीचे बरवे समर्थन असे संस्पृह्य ज्यामाजि ते;
कांतेची असली मला पवन हा पत्रे अता देतसे;
डोळे झाकुनि वाचिता त्वरित ती संमूढ मी होतसे!

आता प्रेमळ ती पुनः परिसतो थोडी तिची भाषणे;
चित्ती आणुनि मी तिला अनुभवी गोडी तिची चुंबने!
ओठा हालविता न मी वदतसे मागील संवाद तो;
मी काल क्रमुनी असा, जड जगा काडीवजा लेखितो!

नाही चैन तुला मुळी पडत ना माझ्याविना मत्प्रिये?
तूते आठविल्याविना दिवसही माझा न जाई सये!
केव्हा येतिल ती दिने न करण्या ताटातुटी आपुली?
केव्हा त्या रजनी? जयांत विसरू मी - तूपणाला मुळी!

माझ्या जन्मधरेपुढे दिसतसे वाराशि विस्तीर्ण तो,
त्याचे रम्य तरंगताण्डव पुनः पाहूनि आल्हादतो;
जे हृदम्य तरंगतांडव मला तैशापरी वाटते
अज्ञेयावरती जसे क्षणिक हे अस्तित्व हो खेळते!

या अब्धीवरतूनि जात असता बाल्यात नौकेतुनी,
गाणी जी म्हटली मला निजविण्या वारिस्थ देवीगणी,
त्यांचे सूर अता अलौकिक अशे जे वात हा आणितो -
ते ऐकून अहा! सुषुप्ति चिर ती ध्यायास मी इच्छितो!

प्रीती या जगतात कंटकयुता ही एक वल्ली असे,
शूलारोपणयूप त्यावरिल ही कीर्तिध्वजा की दिसे;
तेव्हा या जगती नकोत मजला ते भोग भोगायला.
वाटे नाटक शोकसंकुल असे जीवित्व हे याजला!

देवी सागरिका! तुम्ही तर अता ती गायने गाइजे,
त्यांच्या धुंद अफूगुणे किरकिऱ्या बाळास या आणिजे -
निद्रा दीर्घ, जिच्यामधी न कसली स्वप्ने कधी येतिल,
ती निद्रा निजता न मन्नयन हे ओले मुळी होतिल!